# प्रकरण तिसरे

# मराठ्यांचा इतिहास

१७व्या शतकात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची व्याप्ती १८व्या शतकात चोहोबाजूने पेशवे व इतर सरदारांनी विस्तृत केली. उत्तरेकडे शिंदे, होळकर, तर पूर्वेकडे रघुजी भोसले आणि कर्नाटकात पटवर्धन व घोरपडे सरदारांनी मराठी सत्तेचा अंमल बसवला. मराठी सत्ता भारतात एक प्रभावी राजसत्ता म्हणून काही काळ राज्य करीत होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ.स१७०७) मोगल सत्ता क्षीण होत गेली आणि त्याचा फायदा मराठी सरदारांनी व पेशव्यांनी घेऊन मराठी सत्तेला अखिल भारतीय राजसत्तेचे स्वरूप दिले होते.

सर्वसाधारणपणे इ.स.१६०० ते १८१८ पर्यंत म्हणजे शहाजीपासून ते दुसऱ्या बाजीरावाच्या पराभवापर्यंतच्या काळास महाराष्ट्राच्या इतिहासातील '' मराठा काळ '' समजला जातो. भारतीय इतिहासाच्या अठरांव्या शतकावर मराठ्यांचाच सर्वाधिक प्रभाव होता.

आज आपण ज्याला मराठ्यांचा इतिहास म्हणतो तो मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा प्रथम मान युरोपीय विद्वानांनाच जातो. स्प्रिंगल या जर्मन इतिहासकाराने सन १७८६ साली जर्मन भाषेत मराठ्यांचा एक छोटासा इतिहास लिहून प्रसिध्द केला. स्कॉट वेरिंग या इंग्रज व्यक्तीने सन १८१० साली '' मराठ्यांचा इतिहास'' इंग्रजीत लिहून प्रसिध्द केला. ग्रँट डफ या प्रसिध्द इंग्रज इतिहासकाराने सन १८२६ साली मराठ्यांचा सविस्तर इतिहास प्रकाशात आणला. सातारच्या छत्रपतींच्या संस्थानात इंग्रज प्रतिनिधी म्हणून कार्य करणाऱ्या या इंग्रज अधिकाऱ्याने महत्प्रयासाने व अत्यंत चिकाटीने इंग्रजी, डच, फ्रेंच व पोर्तुगीज कागदपत्रांचा व तसेच मराठीत उपलब्ध कागदपत्रांचा सखोल अभ्यास

करून मराठ्यांचा स्वतंत्र इतिहास लिहून महाराष्ट्रातील विद्वानांना मराठा इतिहासाचे दालन खुले करून दिले.

ग्रँट डफ हा भारतातील इंग्रज साम्राज्यवादी सत्तेचा एक घटक होता. म्हणूनच त्याकाळी भारताचा इतिहास लिहिणाऱ्या इतर युरोपिय इतिहासकारांप्रमाणेच ग्रँट डफने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासविषयक ग्रंथामध्येसुध्दा त्याचा साम्राज्यवादी दृष्टीकोन व विचारप्रवाह स्पष्टपणे जाणवतो. विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून त्याचा ग्रंथ महत्वाचा जरी ठरत असला तरी त्याने मराठ्यांचे केलेले मूल्यांकन मात्र पुढे वादाचे व प्रखर टीकेचे लक्ष्य बनले. ग्रँट डफवरील टीकेच्या निमित्ताने का होईना महाराष्ट्रातील तत्कालीन सुशिक्षित तरूण वर्ग मराठा इतिहासाच्या अभ्यास व संशोधनाकडे वळला आणि याचा परिणाम म्हणून मराठा इतिहासाचे सखोल संशोधन करणारी इतिहास संशोधकांची एक पिढीच तयार झाली.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी डफच्या लिखाणाची प्रशंसा केली. पण १८६७ साली निळकंठ जनार्दन कीर्तने यांनी डफच्या लिखाणावर टीका केली. १९व्या शतकाच्या मध्यात ग्रँट डफच्या लिखाणातील गुणावगुणांची चर्चा महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूण करू लागले. कीर्तने यांच्या टीकेमुळे महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूणांच्या राष्ट्राभिमानी भावना जाग्या झाल्या आणि तरूणांनी कीर्तने यांच्या टीकेमुळे प्रेरणा घेऊन मराठ्यांचा खरा इतिहास जाणून घेण्याच्या जिज्ञासेपोटी मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित जुनी कागदपत्रे जमा करण्याची धडपड सुरू केली. यातूनच अनेक इतिहास संशोधक निर्माण झाले.

शिवकालामध्ये काही पाश्चात्य प्रवासी भारतामध्ये येऊन गेले. या प्रवाशांनी आपल्या भ्रमंतीचे सविस्तर वृत्तांत लिहिलेले असून शिवकालातील अनेक घटनांचे त्यांत उल्लेख केलेले आहेत. फ्रेंच प्रवाशांपैकी ट्रॅव्हर्नियर (इ.स.१६४२-६६), बर्नियर (इ.स.१६५५-६७), थेवेनो (इ.स.१६६५-६७), डलॉ (इ.स.१६६९-७४), अॅबेकॅरे (इ.स.१६६८-७३), डिलब्हेल(इ.स.१६७०-७४) इत्यादी. बर्नियरच्या ग्रंथात शिवाजी महाराजांचे चित्र आढळते. अॅबेकॅरे यांच्या वृत्तांतामध्ये शिवाजी महाराज व मराठे यांच्या संदर्भात काही मनोरंजक माहिती आढळते. पोर्तुगीज प्रवासी फादर पिएर द ऑर्लिन्स याने १६८८ च्या सुमारास लिहिलेल्या "Histoire De Sevaji" या ग्रंथातही शिवकालाच्या इतिहासाला उपयुक्त अशी माहिती मिळते. इटालियन प्रवासी निकोलाय मनुची याने आपल्या ग्रंथात काही भाग पोर्तुगीज भाषेत, तर काही भाग फ्रेंच व इटालियन भाषेत लिहिला. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेचा वृत्तांत त्याने दिलेला असून मुघल-मराठा संघर्ष समजावून घेण्यासाठी त्याच्या ग्रंथाचा विशेष उपयोग होतो. अशा या सर्व परकीय व्यक्तींच्या लिखाणाने मराठा इतिहासाचे संशोधन करणारी एक पिढीच महाराष्ट्रात अवतरली.

मराठा इतिहास लेखनास सुदैवाने वैभवशाली परंपरा लाभली आहे. न्या. रानडे, राजवाडे, साने, पारसनीस, खरे, सरदेसाई यांनी आपली सर्व हयात इतिहास लेखनास वाहून घेतली. मराठ्यांचा इतिहास मराठी माणसाने अस्सल साधनांच्या साहाय्याने लिहिला पाहिजे अशा ध्येयाने प्रेरित होवून काशिनाथ नारायण साने, वासुदेव शास्त्री खरे, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, दत्तात्रय बळवंत पारसनीस या थोर इतिहास संशोधकांनी विपुल साधन-सामग्री

अभ्यासकांना उपलब्ध करून दिली. रियासतकार सरदेसाई यांनी मराठ्यांचा समग्र इतिहास रियासतींच्याद्वारे मांडला. वा.सी. बेन्द्रे यांनी मालोजीपासून राजाराम-पर्यंत भोसले घराण्याचा इतिहास लिहिला.

मराठ्यांचा इतिहास हा वस्तुत: भारताचा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे १८व्या शतकात भारतातील एका प्रमुख राजकीय सत्तेत रूपांतर झाले आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मराठ्यांचे वर्चस्व उत्तर आणि दक्षिण भारतात प्रस्थापित झाले. म्हणूनच ग्रँट डफ म्हणतो की, इंग्रजांनी भारत जिंकला तो मराठी सत्तेचा बीमोड करून. मराठी सत्तेचा उदय, विकास आणि अस्त कसा झाला हे कोडे उलगडविण्यासाठी देशी-विदेशी इतिहासकारांनी १७व्या शतकापासून अनेक प्रयत्न केले. न्या. रानडे यांनी तर मराठ्यांच्या इतिहासाच्या अध्ययनामागील नैतिक भूमिका विशद करून दाखवली आणि मराठी सत्तेच्या उत्कर्षाची उत्कृष्ट मीमांसा या शतकाच्या प्रारंभीच केली.

मराठ्यांचा इतिहास ही एक फार मोठी घटना असून ती लिहिणे अतिशय अवघड आहे, हे ग्रँट डफने मान्यच केले होते. मराठ्यांच्या इतिहासात फारसी साधनानांही महत्वाचे स्थान आहे. फारसी साधनांचा अभ्यास केल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास शास्त्रशुध्द दृष्टीकोनातून, चिकित्सक पध्दतीने अभ्यासता येत नाही. मराठ्यांच्या मोगल, आदिलशहा, कुतुबशहा यांच्याशी असलेल्या संबंधांची यथार्थ कल्पना फारसी साधनांच्या अभ्यासाशिवाय येवू शकत नाही. बरीचशी फारसी साधने इतिहास अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याचे

काम सेतुमाधवराव पगडींनी केले. ग.ह. खरे आणि सेतुमाधवराव पगडी यांनी अनेक फारसी साधने मराठीत आणली आणि मराठ्यांच्या इतिहासावर भरपूर लिखाण केले. सेतुमाधवराव पगडी यांचे इतिहास लेखनाचे कार्य फार मोलाचे आहे.

सेतुमाधवराव पगडी हे प्रसिध्द इतिहासकार, थोर विचारवंत, संशोधक, सव्यसाची लेखक, पट्टीचे वक्ते, तत्वचिंतक, रसिक, समीक्षक, फारसीचे अभ्यासक, इतिहासाचे भाष्यकार, कार्यक्षम मुलकी अधिकारी असे त्यांच्या जीवनाचे विविध पैलू आहेत. यातलाच एक अति महत्वाचा पैलू म्हणजे त्यांचे इतिहास संशोधन होय. पगडी हे प्रशासकीय सेवेतील एक अधिकारी. आयुष्यातील फार मोठा काळ त्यांनी शासकीय सेवेत घालविला. मात्र छंद म्हणून अगदी विद्यार्थी दशेपासून इंग्रजी, उर्दू, मराठी व फारसी भाषेतील ललित साहित्यात त्यांनी रूची घेतली.

पगडींनी वाचनाबरोबरच स्वत:ची अभिव्यक्ती सुध्दा विकसित केली. विद्यार्थी दशेत काशी व अलाहाबाद येथे असताना त्यांनी अनेकवेळा महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवरील वक्तृत्व स्पर्धेत भाग घेवून बक्षीसेही पटकावली होती. ते एक उत्कृष्ट वक्ते बनले.

सेतुमाधवराव पगडींच्या अंगी जिज्ञासू वृत्ती व चिकित्सकपणा होता. त्याचप्रमाणे संशोधकाचे गुण व योग्यता होती. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्या गुणवत्तेमुळे अलाहाबाद विद्यापीठाने त्याना संशोधनासाठी शिष्यवृत्ती दिली आणि डॉ.बेनीप्रसाद सारख्या विद्वान प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र या विषयात एक वर्ष संशोधनाचे कार्य

केले. त्यामुळे संशोधनाचे स्वरूप, तत्वे व पध्दती यांचा पूर्ण परिचय त्यांना झाला होता. संशोधकाला लागणारी दृष्टी व चिकाटी त्यांच्यात असल्यामुळेच पुढे खऱ्या अर्थाने ते इतिहास संशोधक बनले.

## पगडींची ऐतिहासिक दृष्टी

ललित साहित्य आणि इतिहास या दोन्ही क्षेत्रांकडे पाहण्याचा पगडींचा दृष्टीकोन अगदी स्पष्ट होता.

'' सामान्यपणे इतिहासाच्या अभ्यासकाला तीन प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. कोणती घटना ? हा पहिला प्रश्न, ती कशी घडली ? हा दुसरा प्रश्न आणि ती का घडली ? हा तिसरा प्रश्न. व्यक्तींचे स्वभाव, त्यांच्या हालचालीमधील प्रेरणा, चळवळीचे मूळ उद्देश, त्यात भाग घेणाऱ्या व्यक्तींचे स्वभावविशेष आणि त्यांचे भलेबुरे परिणाम याबद्दल तो शक्य तितकी उपलब्ध असलेली साधने वापरतो. पण इतके करूनही शेवटी निष्कर्ष काढताना त्याला तर्कावरच भिस्त ठेवावी लागते. फरक इतकाच की, प्रामाणिक इतिहासकार निष्कर्ष का काढला हे आवर्जून नोंदवून ठेवतो. इतिहासकाराच्या प्रतिभेला कितीही मोकळीक असली तरीही तो साधने आणि पुरावे यांनी बांधला गेला आहे हे मान्य केले पाहिजे.''[१]

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असून इतिहास लेखकाला शास्त्रज्ञाच्या भूमिकेतून कार्य करणे आवश्यक आहे असा दृष्टीकोन पगडींनी उपरोक्त विवेचनातून स्पष्ट केला आहे.

" मराठ्यांचा इतिहास " हा पगडींचा जिव्हाळ्याचा भाग असल्यामुळे मराठा इतिहास लेखनातील पूर्वग्रहदोषांच्या बाबतीत ते नेहमी सतर्क राहून चर्चा करीत राहिलेले दिसून येते. पूर्वग्रहदोषांनी पिडीत युरोपिय इतिहासकार व त्यांचेच अंधानुकरण करणाऱ्या बऱ्याच परप्रांतीय भारतीय इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासाविषयी अनेक गैरसमज निर्माण करून ठेवले आहेत. मराठे लूटारू होते, बंडखोर होते. हिंदवी स्वराज्य म्हणजे अचानक निर्माण झालेले वादळ होते. इत्यादी गैरसमजुती वाचून पगडी अस्वस्थ होतात.अशाही परिस्थितीत महाराष्ट्रातील समाज स्वत:च्या इतिहासाकडे गांभीर्याने पाहण्यास तयार नाही याची खंत पगडींना होती. महाराष्ट्रातील माणूस इतिहासाकडे कसा पाहतो याचे वर्णन पगडींनी पुढीलप्रमाणे केले आहे......

" महाराष्ट्रामध्ये पंचायत अशी की, इतिहासाचे ग्रंथ लोक वाचत नाहीत. महाराष्ट्र हा इतिहासाशी परिचित होता तो नाटकामधून आणि कादंबऱ्यामधून. कुणालाही विचारा की संभाजीबद्दलचे चरित्र कोणते ? ते म्हणतील की गडकऱ्यांचा " राजसंन्यास" किंवा औंधकरांची "बेबंदशाही" किंवा वसंत कानेटकरांचे " रायगडाला जेव्हा जाग येते " मराठी वाचकांची नाटक-कादंबऱ्यातील इतिहासावर एवढी श्रध्दा की "कमलकुमारीला" ते सिंहगडावर जावून पाहतील. हा इतिहास नव्हे व त्यांचे लेखक इतिहासकार नव्हेत."[२]

मराठ्यांच्या इतिहासाचे महत्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून भारताच्या राष्ट्रीय जीवनात मराठा इतिहासाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे पगडी सांगतात. परचक्रापासून देशाची मुक्तता, परकीय

आक्रमणापासून देशाचे संरक्षण, भारतीय लोकांचा धर्म व संस्कृती यांचे रक्षण करण्याच्याकामी मध्ययुगीन कालखंडात मराठयांनी केलेल्या प्रयत्नांची काही उदाहरणे पगडींनी मांडली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ महाराष्ट्रापूरतेच महत्वाचे ठरले नसून त्यांच्या कार्याचे पडसाद त्या काळातही सबंध भारतभर उमटले होते. महाराष्ट्राबाहेर उत्तर व दक्षिण भारतात त्यांचा मुक्त संचार सतत चालू असे. शिवाजी महाराजांचे कार्य राष्ट्रीय पातळीवर कसे महत्वाचे ठरते याचे मार्मिक विवेचन पगडींनी पुढील शब्दांत केलेले आहे.

" आपल्या अलौकिक गुणांमुळेच शिवाजी महाराजांनी त्या काळी अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखविली. त्यांच्या स्फूर्तीने अठराव्या शतकातील भारताचा नकाशा पार बदलून गेला. त्या पूर्वीच्या कित्येक शतकात न लाभलेला आत्मविश्वास भारतीयांत निर्माण झाला. शूर, साहसी, उदार, परधर्माविषयी सहिष्णुबुध्दी बाळगणारा असा हा थोर राष्ट्रपुरूष म्हणजे भारताचे अभिमान स्थान होय. आज काळ पालटला आहे. पण ज्या गुणांनी राष्ट्रे निर्माण होतात अगर वैभवसंपन्न होतात, त्या गुणांची जोपासना करणे पूर्वी होते तितकेच आजही आवश्यक आहे. या गुणांचा मिलाफ शिवाजी महाराजांत पूर्णपणे झाला होता. म्हणून त्यांच्या चरित्राचे मनन आणि चिंतन हे भारतीयांना सदैव स्फूर्ती देत राहिल. " [३]

भारतातील अठरावे शतक हे मराठ्यांचे शतक आहे. मराठ्यांच्या अस्मितेला शिवाजी महाराजांनी जागृत केले आणि स्वधर्म, स्वसंस्कृती यांवरील निष्ठेने प्रेरित होऊन मराठ्यांनी भारतीय जनतेला तुर्क-

मोगलव्याप्त इतिहासाची चार शतके विसरायला लावून भारतीयांचा आत्मविश्वास जागृत केला. ही महनीय कामगिरी महाराष्ट्राला सदैव स्फूर्ती देत राहिल.

## मराठ्यांच्या इतिहासाला राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न

भारताच्या इतिहासात मराठ्यांच्या इतिहास कालखंडाचे किती महत्व आहे याची केवळ चर्चा करून पगडी शांत बसले नाहीत. युरोपिय इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास न्याय भूमिकेतून लिहिला नाही असा समज राजवाडे यांचेप्रमाणे सेतुमाधवराव पगडी यांचाही झालेला होता. युरोपिय इतिहासकारांचे अंधानुकरण केलेल्या भारतातील परप्रांतीय इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासाविषयी काही गैरसमज निर्माण करून ठेवले आहेत. त्या गैरसमजूतीचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्रातील इतिहासाच्या अभ्यासकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन पगडींनी केले. त्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करतांना पगडी म्हणतात......

''वास्तविक पाहता मराठ्यांच्या ऐतिहासिक कामगिरी संबंधी पसरलेल्या गैरसमजाचे निराकरण करणे अवघड नाही. ऐतिहासिक व्यक्तीसंबंधीची विधाने ही अशीच खोडून काढता येण्यासारखी आहेत. शिवाजी महाराज निरक्षर होते, मोऱ्यांवरील मोहीम म्हणजे पूर्वनियोजित व बुध्दीपुरस्सर केलेली योजना तसेच अफझलखानाला महाराजांनी दग्याने, विश्वासघाताने मारले या विधानाचा फोलपणा आता अनेक वेळा सिध्द झाला आहे.''[४]

गैरसमजांचे निराकरण करण्याबाबत पगडींनी पुढील उपाय सुचविला आहे.

जुन्या पुस्तकातील व नवीन प्रकाशित झालेल्या पुस्तकांतील अनुचित विधाने निवडून त्याना उत्तरे देण्याचे काम आणि तेही सातत्याने झाले पाहिजे. विद्यापीठ, संशोधन मंडळे, चर्चासत्र, भाषणे, लेख इत्यादींच्याद्वारे हे घडून आले पाहिजे.

पगडी केवळ उपदेशच करीत बसले नाहीत, तर स्वत: त्या कामाला लागले. त्यासाठी संशोधन, व्याख्याने, प्रवास, लेखन इत्यादी उपक्रम त्यांनी हाती घेतले. इ.स.१९६९ साली शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी हे काम मोठ्या प्रमाणात हाती घेतले.

संपूर्ण मराठ्यांच्या इतिहासाचा मूळ आधार म्हणजे छत्रपती शिवाजी संपूर्ण शिवचरित्र देशाच्या सर्व भागातील जनतेसमोर मांडल्यास मराठ्यांच्या इतिहासाचे राष्ट्रीय महत्व सर्वांना समजण्यास मदत होईल, असा विचार पगडींनी केला. शिवचरित्र लिहून जनतेपुढे ठेवले पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने जाणवत होते. पगडींनी हे कार्य स्वत:च हाती घेतले. तोपर्यंत पगडींचा उर्दू, फारसी भाषेतील साधनांचा अभ्यास बराच झाला होता. इतर भाषेतील साधनेही त्यांनी चाळली आणि शिवचरित्र लिहिण्याचे कार्य हाती घेऊन सन १९७४ साली पूर्ण केले.

त्यांनी लिहिलेले '' शिवचरित्र '' सर्वत्र लोकप्रिय बनले. त्यामुळे देशभरातून पगडी यांना व्याख्यानाची असंख्य निमंत्रणे येवू लागली. त्या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला. त्यानिमित्ताने भारतभर प्रवास करून त्यानी मराठ्यांचा इतिहास भारतीय जनतेपुढे मांडण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. त्यांना इंग्रजी, मराठी, कन्नड, तेलगू, बंगाली, हिन्दी, उर्दू व फारसी भाषेचे सखोल

ज्ञान होते. त्यामुळे ते ज्या-ज्या प्रांतात गेले त्या त्या प्रांतीय भाषेतून ते सहजपणे भाषणे देत. उत्कृष्ट वक्तृत्वशैली व बहुभाषिकत्व या त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळे सर्वत्र त्यांची व्याख्याने लोकप्रिय बनली.

इतिहासाचे ज्ञान हे शेवटी समाजासाठी आवश्यक असते. इतिहासातून समाजाला धडे शिकता आले पाहिजेत. प्रेरणा घेता आली पाहिजे. इतिहासातील संशोधन इतिहास संशोधकापुरतेच मर्यादित राहिल्यास त्याचीही उपयुक्तता समाजाच्या दृष्टीने कवडीमोल ठरते. म्हणून संशोधन हे सार्वजनिक व्याख्यानांत आणि लोकप्रिय भाषणात आले पाहिजे, असा पगडींचा आग्रह होता.[५]

इतिहास संशोधन व व्याख्यानांच्या निमित्ताने सेतु माधवराव पगडींनी आपल्या आयुष्यात एकूण दीड लाख मैलांचा प्रवास केला. काश्मीर ते कन्याकुमारी व अरूणाचल प्रदेशापासून ते गुजरात राजस्थानपर्यंत सर्वत्र हिंडून ९० ठिकाणी एकूण १५०० व्याख्याने व भाषणे दिली. एवढेच नव्हे तर अदमासे १२०० लेख लिहून वेगवेगळ्या वर्तमानपत्रे व नियतकालिकातून प्रकाशित केले.[६] त्यांनी केलेला हा प्रपंच म्हणजे त्यांची इतिहासावरील निष्ठा व प्रेम होय.

अखंडपणे केलेले इतिहास संशोधन व मराठ्यांच्या इतिहासाचे महत्व प्रतिपादित करण्यासाठी त्यांनी भारतभर केलेल्या भ्रमंतीमुळे ''एक श्रेष्ठ इतिहास संशोधन व इतिहासाचा पंडित'' म्हणून देशभर त्यांची ख्याती झाली.याची दखल बऱ्याच सार्वजनिक संस्थांनी तर घेतलीच, पण शासनालाही पगडींच्या महत्वपूर्ण कार्याची दखल घेवून त्यांच्या कार्याचा गौरव करणे भाग पडले.

# पगडींनी इतिहास संशोधन पध्दतीबद्दल मांडलेली मते

पगडींचे इतिहास संशोधन इतिहास लेखन शास्त्राला अनुसरूनच होते. वाचन, मनन, चिंतन, जिज्ञासा, चिकित्सा व शिस्त या संशोधनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी पगडींच्या अंगी असल्यामुळे त्यांचे इतिहास संशोधन शास्त्रशुध्द व सूत्रबध्दच ठरले आहे.

इतिहास संशोधनाचे कार्य किती गंभीर व जबाबदारीचे असते आणि इतिहास संशोधकाने जबाबदारीची जाणीव ठेवली नाही तर इतिहासातून विनोद कसे निर्माण होतात आणि परिणामत: काल्पनिक घटना किंवा व्यक्ती यांना इतिहासात कसे स्थान प्राप्त होते याचे रोचक व अर्थपूर्ण विवेचन पगडींनी पुढीलप्रमाणे केले आहे......

इतिहास संशोधकाचे काम तसे म्हटले तर बरेचसे जिकीरीचे आहे. प्रकाशित ग्रंथांच्या वाचनाने त्याचे समाधान होत नाही. ग्रंथकाराचा हेतू काय, त्यांच्यावर कोणत्या प्रकारचे संस्कार झाले आहेत. आपल्या लेखनात त्याने वस्तुनिष्ठ दृष्टीकोण किती वापरला आहे, त्याच्या वर्णनात प्रामाणिकपणाकडे किती लक्ष देण्यात आले आहे, त्याच्या विधानांना आधारभूत असलेली साधने किती व कोणती, ती त्याने किती प्रमाणात आत्मसात केली आहेत, हे इतिहासाच्या अभ्यासकाला तपासून पहावे लागते. यात विसंगती आढळली की, विनोद निर्माण होतो.

उदाहरणार्थ: सगळे मराठे म्हणजे शिवाजी असा ग्रह काही फारसी व इंग्रजी साधनातून आढळून येतो. तसाच आणखी एक गैरसमज एकदोन

फारसी ग्रंथातून आढळला. नाना फडणवीसांनी बरीच वर्षे कारभार केला. फारसी लेखकांचा समज असा की मराठी राज्याच्या मुख्य कारभाऱ्याला नानाच म्हणतात. त्यामुळे सदाशिव माणकेश्वर हा बाजीराव पेशव्याचा कारभारी झाला, हे नमूद करताना त्यांनी लिहिले की, सदाशिव माणकेश्वर हा नाना झाला.[७]

मराठ्यांच्या इतिहासाची साधने तपासत असताना सेतुमाधवराव पगडींनी विशेषत: फारसी भाषेतील ग्रंथ, त्यांचे अनुवाद आणि त्या ग्रंथावर आणि अनुवादावरील आधारलेले ग्रंथ त्यांच्या पाहण्यात आले. ग्रंथांचे चुकीचे वाचन, भाषेच्या अपुऱ्या ज्ञानामुळे झालेले चुकीचे अनुवाद आणि त्यातून निर्माण झालेले गैरसमज यांमधून अभावितपणे निर्माण झालेले विनोद इत्यादींवर त्यांनी आपल्या लेखन-व्याख्यानातून प्रकाश टाकण्याचे महनीय कार्य केले आहे.

पगडी यांना फारसी, मोडी, उर्दू, भाषा अवगत होत्या. त्यामुळे पेशवेकालीन मराठी पत्रव्यवहारात वापरलेल्या हजारो फारसी शब्दांचे अर्थ ते लावू शकले आणि त्यामुळे इतिहासातील विनोद कळू शकले.

इतिहासातील हे विनोद व निर्माण झालेल्या गैरसमजूती संशोधनाच्या आधारे दूर करण्याचा प्रयत्न केला गेला नाही तर खोटा इतिहास समाजापुढे मांडला जाण्याचा धोका असतो. म्हणून पगडींनी आपल्या लिखाणात विनोदाची अनेक उदाहरणे देऊन इतिहास अभ्यासकांनी असे विनोद इतिहासातून नाहीसे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले.

उदाहरणार्थ : संभाजीराजांनी रायगडावर येताच सोयराबाईवर विषप्रयोगाचा आरोप करून तिला भिंतीत चिणून मारली, ही गोष्ट धादान्त खोटी आहे. संभाजीराजे, महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर जून १६८०

मध्ये आले. सोयराबाईचा मृत्यू बरोबर एक वर्षाने झाला. १६८१ मध्ये संभाजीराजांच्याविरूध्द आण्णाजी दत्तो, सोयराबाई, हिरोजी फर्जंद इत्यादींनी कट केला होता. त्या सुमारास सोयराबाईचा मृत्यू झाला आहे. आपल्या सावत्र आईने महाराजांना विषप्रयोग केला असे संभाजीने कोठेच म्हटले नाही. उलट तो तिला ' स्फटिकासारखी निर्मळ मनाची' असे समजतो. विषप्रयोगाचा आरोप, भिंतीत चिणणे इत्यादी गोष्टी हास्यास्पद आहेत.[८]

संशोधनाच्या आधारेच पगडींनी मराठ्यांच्या इतिहासातील गैरसमजूती विनोद आणि खोटारडेपणा वेशीवर टांगण्याचे धाडस केले. संशोधनाच्या निमित्ताने इतिहासाचे ग्रंथ व इतर विविध प्रकारची ऐतिहासिक साधने हाताळतांना त्यांनी काय खबरदारी घेतली व कोणती परिमाणे वापरली याची माहिती आपल्याला त्यांच्या पुढील विश्लेषणातून मिळते.

'' आपण इतिहासाचे ग्रंथ वाचतो. केवळ इतिहास वाचल्यानंतर तो इतिहास खरा आहे असे समजण्याची वृत्ती राहू नये. पहिली गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की, हा इतिहास लेखक कोण आहे . हा कोणत्या वातावरणात वाढला आहे . त्याच्यावर संस्कार कोणते झाले आहेत . कोणत्या गोष्टींनी त्याला आनंद वाटतो आणि कोणत्या गोष्टींचे याला दु:ख होते . कोणत्या गोष्टी अनुल्लेखाने तो टाळतो आणि कोणत्या आवर्जून लिहितो . या गोष्टी आपण पहिल्यांदा लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यामुळे कोणताही ग्रंथ समोर आला की, इतिहास लेखनशास्त्र तत्वाप्रमाणे मी पहिल्यांदा हे पाहतो की, हा लेखक कोण आहे, याला चरित्र नायकाची सहानुभूती किती आहे. उदाहरणार्थ मुहंमद काजीमला आलमगीरबद्दल सहानुभूती आहे, तर कवी परमानंदाला शिवाजी

महाराजांबद्दल सहानुभूती आहे.''[१]

पगडी यांनी आपल्या इतिहास संशोधनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या भाषांतील जे ग्रंथ व साधने अभ्यासली त्या सर्वांना उपरोक्त नियम लागू करून इतिहासातील घटना,व्यक्ती व प्रसंगांचा खरे-खोटेपणा सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधन प्रक्रियेत फारसी साधनांकडे फारच दुर्लक्ष झाल्याची तीव्र जाणीव पगडींना झाल्यामुळे ते उर्दू-फारसी साधन साहित्याकडे वळले. मराठ्यांच्या इतिहासावर भरीव प्रकाश टाकणारे उर्दू-फारसीतील साहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे मराठा इतिहास संशोधनासाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल असे पगडींचे स्पष्ट मत होते. फारसी साधने मराठ्यांच्या विरोधी पक्षातील लेखकांनी लिहिलेली असल्यामुळे त्यातून केवळ मराठ्याविरूध्दची मते व भावना व्यक्त होतात असे गृहीत धरून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे संशोधनाच्या दृष्टीने अशास्त्रीय ठरते, अशा मताचे पगडी होते. शिवचरित्राचा सर्वांगीण अभ्यास करीत असताना शत्रुपक्षातील लोकांचा शिवाजीकडे पाहण्याचा दृष्टीकोन आणि त्यांनी शिवाजीचे केलेले मूल्यमापन या गोष्टी तपासावयाच्या असतील तर तत्कालीन फारसी साधन साहित्याशिवाय पर्याय उरत नाही. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दाचा अभ्यास तर फारसी साधनांशिवाय होऊच शकत नाही. कारण या प्रकरणावर प्रकाश टाकणारी मराठी साधने फारच त्रोटक प्रमाणात उपलब्ध आहेत. स्वातंत्र्य युध्दाच्या धामधुमीत मराठे इतिहास घडविण्यात व्यस्त असल्यामुळे इतिहास लिहून काढण्यास त्यांना वेळच नव्हता. ही उणीव बऱ्याच प्रमाणात भरून काढण्याचे

कार्य एका अर्थाने फारसी साधनांनी केलेले आहे.[१०]

म्हणूनच पगडींनी फार मोठ्या प्रमाणात फारसी साधन साहित्य मराठीत अनुवादित करून मराठ्यांच्या इतिहास अभ्यासकांची फार मोठी सोय करून ठेवली आहे. फारसी साधन साहित्याचा मराठी अनुवाद एकीकडे करीत असताना दुसरीकडे त्याचवेळेस त्यांनी त्यांतील मजकुराचे वाचन व चिंतन करून त्याचा अन्वयार्थ लावण्याचाही प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासातील बऱ्याच प्रकरणावर नवीन प्रकाश पडण्यास मदत झालेली आहे.

उदाहरणार्थ: फारसी साधनांच्या आधारे पगडींनी १८ व्या शतकातील दक्षिण भारतातील राजकीय परिस्थिती, घडलेल्या घटना, होऊन गेलेल्या व्यक्ती आणि निर्माण झालेले प्रवाह याचा सविस्तर आढावा घेतला आहे. मराठ्यांच्या इतिहासावर स्पष्ट प्रकाश टाकणाऱ्या मोगल दरबारातील हजारो बातमीपत्रांचे अनुवाद केले. मोगल-मराठे संबंध, मराठे-निजाम संबंध, पेशवा-निजाम संबंध, शिवराय-आग्रा भेट, पेटाऱ्याची कथा, तिसऱ्या पानिपत संग्रामाविषयी लेखन इत्यादी अनेक गोष्टींवर प्रकाश पडण्यास मदत झाली.

## इतर इतिहास संशोधकांचा चिकित्सक आढावा

मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन करीत असताना मराठ्यांच्या इतिहासासंबंधी संशोधन व लिखाण केलेल्या इतर संशोधकांचा चिकित्सात्मक आढावा पगडींनी घेतला आहे. हे करीत असताना आपल्या अगोदरच्या व स्वत:च्या समकालीन इतिहासकारांच्या संशोधनातील महत्वाच्या चुका निदर्शनास आणून देणे व त्यांच्या मतांचे खंडण करून स्वत:चे निष्कर्ष

मांडण्याचे महत्वपूर्ण कार्य पगडींनी केले आहे. मात्र त्यांच्या खंडण-मंडण प्रक्रियेतून इतर इतिहासकारांबद्दल त्यांच्याकडून कोठेही अनादर व्यक्त झाल्याचे दिसून येत नाही. उलट त्यांनी इतरांचा आदर व कौतुकच केलेले आहे. परंतु इतिहासातील सत्य उलगडून दाखवित असताना मात्र ते अत्यंत परखड व तसेच नम्रही राहिलेले आहेत. इलियट आणि डाऊसनने केलेल्या फारसी ग्रंथांच्या अनुवादातील अनेक चुका व त्रुटी परखडपणे दाखवून देत असतानाच पगडी त्यांच्या कार्याचे महत्व पुढील शब्दांत सांगतात......

इलियट आणि डाऊसन यांनी केलेले फारसी ग्रंथांचे इंग्रजी अनुवाद हे इतिहास अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरलेले आहेत. सुमारे १०० वर्षापूर्वी भारताच्या इतिहासाची फारसी साधने एकत्र आणून शेकडो ग्रंथांचा परिचय घडवून आणणे हे काही सामान्य काम नव्हे. इलियट आणि डाऊसनचे आठ खंड म्हणजे इतिहासाच्या अभ्यासकांना एक अमूल्य ठेवा वाटावा, असे त्यांचे महत्व आहे.[११]

जदुनाथ सरकार यांनी फारसी ग्रंथांतील मजकुराच्या इंग्रजीत केलेल्या अनुवादात बऱ्याच चुका केल्या असल्याचे पगडींचे मत आहे. सर जदुनाथ सरकारांचा ''मासिरे आलमगिरी''चा इंग्रजी अनुवाद उत्कृष्ट झाला असला, तरी बऱ्याच मूळ फारसी शब्दांचा संदर्भानुरूप अर्थ देण्यात गल्लत झाली असल्याचे पगडींनी आपल्या विवेचनात दाखवून दिलेले आहे.[१२]

उदाहरणार्थ: मराठ्यांचे किल्ले घेत औरंगजेब फिरत होता. त्या काळात मोगलांचे अतिशय हाल झाले. असंख्य असे मोगल सैनिक सर्वस्वाला मुकून इतस्तत: भटकू लागले. या संबंधात जो फारसी वाक्प्रचार आहे तो म्हणजे

आपले सामान कोंबड्यावर लादणे असा आहे. कोंबड्याची पाठ ती काय आणि तिच्यावर सामान किती लादणार ? म्हणजेच त्या माणसापाशी काही राहिले नाही असा अर्थ घ्यावयाचा, पण जदुनाथांनी त्या वाक्याचे शब्दश: भाषांतर केले. लोक भटके बनले. याचा अर्थ त्यांनी असा घेतला की मोगल सैन्यात भटक्या जमाती म्हणजे जिप्सी जमाती होत्या. त्यांनी लिहिले की- '' सैन्यातील जिप्सींनी आपले सामान आपल्या कोंबड्यांवर लादले.''[१३]

फारसी भाषेच्या अपुऱ्या ज्ञानामुळे इतिहासकार गो.स.सरदेसाई यांच्याकडून सुध्दा फारसी शब्दांचा अर्थ लावण्यात गल्लत झाल्याचे पगडी सांगतात. आपल्या पेशवे दप्तरातील तळटीपेत सरदेसाईंनी ''बोरया'' या फारसी शब्दाचा अर्थ '' चटई'' असा लावून '' निजामाने आपल्या मुख्य प्रधानाला (गुलामसय्यद) बोलाविले तर त्याला बसवण्यासाठी चटईशिवाय दुसरी बैठक त्याला आढळली नाही.'' असा संदर्भ दिला आहे. मूळ फारसी शब्द ''बार याबी'' असा असून '' हजर होणे'' असा त्याचा अर्थ होतो. '' बार याबी झाली म्हणजे हजर होण्याची परवानगी मिळाली''. मुख्य प्रधान गुलामसय्यद याची निजामापाशी बार याबी झाली याचा अर्थ असा की, गुलामसय्यदला निजामाच्या हुजूरात हजर राहण्याची परवानगी मिळाली.[१४]

कै.शेजवलकरांनी सुध्दा गफलत करून घेतल्याचे पगडी सांगतात. '' आपण ज्या अर्थाने श्रीमंत, महाराज, हिजहायनेस हे शब्द वापरतो, त्या अर्थाने उर्दू फारसीत ''बंदगाने आली'' हा शब्द वापरतात. निजाम निजामअलीखान (इ.स.१७६३ ते १८०३) याचा उल्लेख समकालीन कागदपत्रातून ''बंदगाने अली'' म्हणजे हिज हायनेस म्हणून आढळतो. शेजवलकर यांना ते

टोपणनांव वाटून त्यानी आपल्या " पेशवे - निजाम " या ग्रंथात " निजाम अल्ली उर्फ बंदगाने अल्ली हा गादीवर आला" अशी माहिती दिली आहे. अर्थात शिवाजी उर्फ महाराज किंवा नानासाहेब उर्फ पेशवे उर्फ श्रीमंत असे म्हणण्यासारखेच झाले." [१५]

वा.सी.बेंद्रे यांनी सुध्दा यदुनाथ सरकारांच्या मजकुराचे भाषांतर देताना चांगलाच विनोद निर्माण केला आहे.......

औरंगजेबाने इ.स.१७०३ च्या एप्रिल महिन्यात सिंहगडचा किल्ला घेतला. त्याने किल्ल्याचे नांव 'बख्शिदाबख्श' ठेविले. औरंगजेबाचा चिटणीस साकी मुस्तैदखान याने 'मासिरे आलमगिरी' या नावाचे औरंगजेबाचे चरित्र लिहिले आहे. त्यात ही हकीकत आहे. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर जदुनाथ सरकारानी केले. बेंद्रे नी या मजकुराचे भाषांतर केले.

मासिरेतील उल्लेख असा- " २३ जानेवारी १७०६ रोजी जेव्हा बादशहाची स्वारी अहमदनगरास जाण्यास निघाली तेव्हा नसरत जंगखान यास बक्षीस देवून बक्षेंद्रबक्ष यांचेवर रवाना केले." पान ६५८ वर ते म्हणतात, " हरकऱ्यांनी बादशहाकडे बातमी आणली की, नस्त्रतजंगने बक्षेंद्रबक्षास पुन्हा पकडले."

वास्तविक पाहता बख्शिदाबक्ष हे सिंहगडाचे औरंगजेबाने दिलेले नांव, जुल्फिकारखान नुस्त्रतगंज याने ते स्थळ फिरून जिंकून घेतले. जदुनाथांचा इंग्रजी शब्द 'रीक्याप्चर' असा आहे. बेंद्रयांच्या अनुवादात बख्शिदाबख्श बक्षेंद्रबक्षी बनले आणि या व्यक्तीला स्थळाला नव्हे, नुस्त्रतजंगाने पुन्हा पकडले. [१६]

कै.वासुदेव शास्त्री खरे यांचीही गफलत झाल्याचे सेतुमाधवराव पगडींनी दाखवून दिले. खजिना एका स्थळापासून दुसरीकडे हलविताना यांचे रक्षण करण्यासाठी शिपायांचे पथक देण्यात येते, (संरक्षकपथक) त्याला 'बदरका' म्हणतात. पण वासुदेव शास्त्री खरे यांना वाटले की, बदरका म्हणजे बदरखा नावाची व्यक्ती असावी. त्यांनी या वाक्याबद्दल टीप देताना नमूद केले आहे. "हा बदरका कोण हे कळत नाही बहुधा हा कोणी तरी गारदी सरदार असावा."[१७]

## पगडी यांचे शिवकाळाविषयीचे संशोधन

सेतुमाधवराव पगडींनी इतिहास संशोधनाच्या प्रक्रियेतून मराठ्यांच्या इतिहासातील सर्व घटनांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन व लेखन करताना त्यांनी शिवचरित्रावर अधिक भर दिल्याचे दिसून येते. मराठ्यांच्या इतिहासातील जी काही वादस्थळे त्यांना दिसली ती त्यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

वेगवेगळ्या भाषांतील साधन साहित्याचा आधार घेऊन व प्रसंगी तर्काची जोड देऊन मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाच्या अनुषंगाने पगडींनी इ.स.ची १७ व १८ ही दोन्ही शतके अक्षरश: पिंजून काढली आहेत. सेतुमाधवरावांनी केवळ शिवाजी नजरेसमोर ठेवला नाही. तर त्यांच्या डोळ्यासमोर सर्व मराठेशाही होती. शहाजीराजांच्या जन्मापासून दुसऱ्या

बाजीरावांच्या पदच्युतीपर्यंतचा सगळा इतिहास म्हणजे सुमारे दोनशे वर्षाचा इतिहास त्यांच्या डोळ्यांसमोर होता.[१८]

शिवाजी महाराजांच्या संबंधी त्यांच्या हयातीतच लिहिणारे होते. त्यात संस्कृत, मराठी, पर्शियन, दक्षिणी, उर्दू, इंग्रजी, पोर्तुगीज, डच, फ्रेंच इत्यादी भाषांमधून लिहिण्याची जी काही परंपरा सुरू झाली ती त्यांच्या हयातीपासूनच, पगडींच्या पूर्वी अनेक इतिहासकारांनी शिवचरित्र लिहून शिवाजी व त्यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची प्रदीर्घ चर्चा केली आहे. शिवचरित्रावर अगोदरच मोठ्या प्रमाणात लिखाण झाले असताना सुध्दा पगडींना शिवचरित्राकडे वळण्याची काय आवश्यकता भासली ? याचे उत्तर आपल्याला पगडींच्या पुढील विधानातून सापडते. या संदर्भात पगडी लिहितात. शिवचरित्राच्या अभ्यासकाला संशोधन करताना अनेक शंकास्थळे आढळतात. काही स्थळे सहज नजरेसमोर येतात. उदाहरणार्थ:

१) शिवजन्मतिथी

२) शिवचरित्रातील शहाजींचे स्थान

३) स्वराज्याचा उपक्रम कधी सुरू झाला, तात्कालिक प्रेरणा कोणती ?

४) बजाजीचे शुध्दीकरण

५) चंद्रराव मोरे याचा पाडाव, त्यात दगा होता की ती सरळ स्वारी होती ?

६) अफजलवध प्रसंग

७) शास्तखानावरील छाप्याचा तपशील

८) बाजी घोरपड्यासंबंधीचे पत्र विश्वसनीय आहे काय ?

९) आग्र्याहून महाराज कोणत्या वाटेने आणि किती दिवसांनी परत आले ?

१०) दक्षिण दिग्विजय हेतू काय ?

११) शिवाजी-व्यंकोजी संबंध

१२) शिवाजी-संभाजी संबंध

१३) सोयराबाईचे महत्व किती ?

अशा अनेक बाबींची साद्यंत चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. असे त्यांचे मत होते. शिवचरित्रावर असलेल्या सध्याच्या काही ग्रंथात एका लेखकाचे मत दुसऱ्याच्या मताशी जुळत नाही. बरे, आपल्या मताच्या समर्थनात किंवा इतरांचे मत खोडून काढण्यासाठी साधनांचा हवाला देण्यात येत नाही. मग त्यांची चर्चा तर बाजूलाच राहिली. यामुळे सामान्य वाचक गोंधळून जातो आणि तो शिवचरित्रावरील कथा व कादंबऱ्यांकडे वळतो. महाराजांचे चांगले चरित्र लिहिले जाण्यासाठी प्रथम वरील बाबींच्यावर विद्वानांनी चर्चा करून सर्वमान्य निष्कर्ष काढणे आवश्यक आहे, असे पगडींचे मत होते.[१९]

अनेक इतिहासकारांमध्ये शिवचरित्रातील काही महत्वाच्या बाबींबद्दल शंका व गैरसमज निर्माण झालेले दिसून येतात. उपलब्ध साधन साहित्याचे वाचन आणि त्याचा अन्वयार्थ लावण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या या शंका व गैरसमजूती असून त्या नाहीशा करण्यासाठी नव्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. असे पगडींना वाटत होते. त्यासंदर्भात ते पुढील मत मांडतात.

" शिवाजी महाराजांची आजपर्यंत इंग्रजी आणि मराठीतील चरित्रे आणि तीही सर्वमान्य लेखकांकडून लिहिली गेलेली बरीचशी आहेत. इंग्रजी चरित्र लेखकांत चिंतामणराव वैद्य, सर जदुनाथ सरकार, रॉलिन्सन, किन्केड, डॉक्टर बाळकृष्ण, केळूसकर, प्रा.ताकखाव, कुलकर्णी इत्यादी मंडळी आहेत.

मराठी चरित्रकारांतील प्रमुख म्हणजे चिंतामणराव वैद्य, सरदेसाई, केळूसकर, भावे, काळे, पुरंदरे आणि शेजवलकर हे होत. शिवचरित्रावर विविध भाषांतील साधनांची सारखी भर पडत आहे. संस्कृत, मराठी, फारसी, दक्षिणी उर्दू, हिन्दी, इंग्रजी, फ्रेंच, डच, पोर्तुगीज इत्यादी भाषांतील साधने आता अभ्यासकांस उपलब्ध झाली आहेत. तसे पाहता महाराजांचे एक चांगल्यापैकी चरित्र लिहिले जाण्यास काही प्रत्यवाय नसावा. साधने उपलब्ध असूनही महाराजांचे निर्दोष असे चरित्र का बाहेर पडू नये हे समजत नाही.''[२०]

निर्दोष ठरणारे शिवचरित्र लिहिण्याची गरज, आणि निर्माण झालेली तळमळ यामुळे पगडी जाणीवपूर्वक शिवचरित्राकडे वळले. सतत चार वर्षे रात्रंदिवस कष्ट घेऊन शेवटी इ.स.१९७४साली '' छत्रपती शिवाजी'' नावाचे इंग्रजी भाषेतील शिवचरित्र पूर्ण करून उपरोक्त गरजेची पूर्तता करण्याचाच प्रयत्न त्यांनी केला.

## शिवजन्मतिथीचा वाद

मराठ्यांच्या '' हिंदवी स्वराज्य'' या स्वतंत्र राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी यांचा जन्म नक्की कोणत्या साली झाला याबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. यामधून १६२७ व १६३० अशा दोन जन्मतारखा मानल्या गेल्या. मराठी, संस्कृत, हिन्दी, इंग्रजी आणि फारसी साधन साहित्यातील एकूण वृत्तांताचा ताळमेळ घालून पगडींनी १६२८ हे शिवजन्माचे वर्ष असल्याचे प्रतिपादन केले.

शिवजन्मतिथीचा वाद तसा फार जुना आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये शिवजन्मतिथीबाबत अद्यापही एकमत होऊ शकलेले नाही.

इ.स. १९०० साली इतिहासकार राजवाडे यांनी आपल्या ''मराठ्यांच्या इतिहासाची साधने'' या ग्रंथांच्या चौथ्या खंडात विविध साधनांचा आधार घेवून शके १५४९, प्रभव संवत्सर, वैशाख शुध्द द्वितीया सोमवार, रोहिणी नक्षत्र, (इ.स.१६२७) ही शिवजन्म तिथी मांडली. बाल गंगाधर टिळक यांनी राजवाड्यांनी मांडलेली ही तिथी मान्य केली. सन १९०७ साली लोकमान्य टिळकांच्या हाती जेधे घराण्याची शकावली सापडली. जेधे शकावलीचा अभ्यास करून लोकमान्य टिळकांनी दुसरीच शिवजन्मतिथी मांडली. टिळकांच्या मते शके १५५१ शुक्ल संवत्सर फाल्गुन वद्य तृतीया ( १९ फेब्रुवारी,१६३० )ही शिवजन्मतिथी होती.

अनेक वर्षे प्रयत्न करूनही इतिहासकारांत एकमत होत नाही, असे पाहून शेवटी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आणि महाराष्ट्रातील नामवंत इतिहासकारांना एकत्र आणून व त्यांच्यात चर्चा घडवून त्याच्यांत एकमत होते का यासाठी १९६६ साली ''शिवजन्मतिथी निर्णायक समिती''ची स्थापना केली.या समितीचे निमंत्रक होते त्यावेळचे पुराभिलेख व पुरातत्व विभागाचे संचालक मो.ग.दिक्षित. या समितीत महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, न.र.फाटक, डॉ.आप्पासाहेब पवार, ग.ह.खरे, वा.सी.बेंद्रे आणि ब.मो. पुरंदरे यांचा समावेश करण्यात आला. समितीतील सर्व मान्यवर तज्ञांनी आपआपली

मते साधार व सविस्तरपणे मांडली. पण त्यांच्यात एकमत होवू शकले नाही.

फाल्गुन वद्य तृतीया, शके१५५१ (इ.स.१६३०)या शिवजन्म तिथीचा पुरस्कार दत्तो वामन पोतदार, ग.ह.खरे, वा.सी.बेंद्रे, ब.मो.पुरंदरे आणि मो.ग.दिक्षित यांनी केला. तर वैशाख शुध्द द्वितीया, शके १५४९(इ.स.१६२७) या तिथीचा पुरस्कार न.र.फाटक आणि डॉ.आप्पासाहेब पवार यांनी केला. इतिहास तज्ज्ञांमध्ये एकमत होत नाही, हे पाहून महाराष्ट्र शासनाने स्वत:चा शासकीय निर्णय- अ.शा.क्रमांक ए.एन्.एम्.१०६६-ऊ-४६४५-शिक्षण व समाज कल्याण विभाग, सचिवालय विस्तार भवन, मुंबई-३२ अन्वये दिनांक ९ मे, १९६७ रोजी पुढीलप्रमाणे घोषित करून या प्रश्नावर तात्पुरता पडदा टाकला. महाराष्ट्र शासनाचा निर्णय :

'' ठाम पुरावा उपलब्ध होईपर्यंत किंवा इतिहास तज्ज्ञांत एकवाक्यता येईपर्यंत शासनाने समारंभाच्या सोईसाठी जुनीच तिथी म्हणजे वैशाख शुध्द द्वितीया, शके१५४९ (इ.स.१६२७) ही चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.''[२१]

सभासद बखर, ९१ कलमी बखर, जेधे शकावली आणि कवी परमानंद लिखित शिवभारताचा आधार घेऊन इ.स.१६२७ आणि इ.स.१६३० ही जन्मतिथीची वर्षे मानण्याचा प्रयत्न इतिहासकारांनी केला आहे. परंतु सेतुमाधवराव पगडी यांनी खरी जन्मतिथी इ.स.१६३० नसून १६२८ असल्याचे सांगितले. आपला विचार अधिक स्पष्ट करतांना पगडी म्हणतात,

''माझ्या मते, शहाजी आणि दर्याखान यांची लढाई फक्त एकदाच झाली आहे, आणि तीही इ.स१६२८ मध्ये. बादशहानाम्यात आणि शिवभारतात ज्या लढाईचा उल्लेख आहे ती हीच. शहाजी मोगलांना मिळाला तो

१६३० च्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात...... शहाजी नोव्हेंबर १६३० मध्ये मोगलांना मिळाल्यानंतर आणि जानेवारी १६३१ मध्ये दर्याखान हा बुन्देलखंडात मारला जाईपर्यंत शहाजी आणि दर्याखान यांची गाठच पडली नाही. मग लढाई होवून दर्याखान जखमी होणे आणि त्याचे गर्वहरण होणे या गोष्टी दूरच राहिल्या. परमानंद उल्लेख करतो तो इ.स.१६२८ च्या लढाईचा संभाजी-जयंतीचे लग्न उरकून आणि आपल्या गरोदर पत्नीला शिवनेरीवर ठेवून शहाजी सन १६२८ मध्ये दर्याखानच्या मोहीमेवर निघून गेला आणि तो मोहिमेवर असताना इकडे शिवाजी महाराजांचा जन्म झाला असे परमानंद म्हणतो, यावरून महाराजांचा जन्म इ.स.१६२८ मध्ये झाला हे ठरते. इ.स.१६३०, फेब्रुवारी १९ ही महाराजांची जन्मतारीख शहाजीच्या हालचालीशी जुळत नाही.''[२२]

## हिंदवी स्वराज्याची संकल्पना

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा उल्लेख '' हिंदवी स्वराज्य '' असा करण्यात येतो. सेतुमाधवराव पगडींनी हिंदवी स्वराज्याचे स्पष्टीकरण केले आहे ते म्हणतात......

''हिंदवी हा शब्द आज ज्या अर्थाने आपण 'इंडियन नेटिव्ह' 'इंडियन्स' म्हणजे 'एत्‌देशीय' असे शब्द वापरतो त्या अर्थाने सोळाव्या शतकात मोगल, तुर्क, इत्यादी राज्यकर्ते वापरीत. शिवाजी महाराजांच्या उद्योगामागे

प्रामुख्याने हिंदवी स्वराज्याची वरील कल्पना होती. विजापुरात पठाणांचा जोर, निजामशाहीत हबशांचे प्राबल्य आणि उत्तरेत मोगल हे तत्कालीन राजकारणाचे स्वरूप ओळखून त्यांनी एतद्देशीय म्हणजे हिंदवी स्वराज्य हे ध्येय आपल्यासमोर ठेवले. त्यात धर्म, संस्कृती आणि राजकारण यांचा बेमालूम संयोग झाला हे स्पष्ट आहे.''[२३]

रोहिडेश्वराच्या मंदिरात आपल्या सवंगडयासोबत शिवाजीने हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेची शपथ घेतली असे आजकालच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांना शिकवले जाते. परंतु या घटनेला सबळ पुराव्याचा आधार नाही, असे सांगून पगडींनी या घटनेचा इन्कार केला आहे. १६४७ साली दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूनंतरच शिवाजीच्या राजकीय हालचालींना सुरूवात झाली. अगदी सुरूवातीपासूनच स्वराज्य स्थापनेचा ध्येयवाद शिवाजीकडे नव्हता असे पगडींचे मत आहे.

इ.स.१६४७ मध्ये दादोजी कोंडदेवाचा मृत्यू झाल्यानंतर शिवाजीच्या राजकीय हालचालींना सुरूवात झाली. तसेच सुरूवातीपासून शिवाजीच्या मनात हिंदवी स्वराज्याचा ध्येयवाद होता काय ? सेतुमाधवराव पगडी यांनी मात्र ही गोष्ट अमान्य केली आहे. सुरूवातीचा शिवाजीचा दृष्टीकोन मर्यादित होता, असे सांगून पित्याकडून मिळालेली पुण्याची किल्ल्यासहित जहागिरी संपूर्णत: आपल्या ताब्यात आणावी एवढ्याच मर्यादित हेतूने शिवाजीने आपला संघर्ष आदिलशाहीविरूध्द सुरू केला. सुदैवाने त्यांना यश मिळाले. पुणे जहागिरीतील बहुतेक सर्व किल्ले शिवाजीने आदिलशाहीकडून जिंकून घेतले.

मिळत गेलेल्या किल्ल्यामुळे शिवाजीचे धाडस व महत्वाकांक्षा वाढत गेली. महाराष्ट्रातील किल्ल्यासहित सर्व प्रदेश ताब्यात घेण्याची शिवाजीची कल्पना नंतरची आहे. इ.स.१६७४ साली झालेल्या शिवराज्याभिषेकाच्या प्रसंगातून ''हिंदवी स्वराज्याची'' कल्पना पुढे आली आणि राज्याभिषेकानंतर ती मूर्तरूपास आली. म्हणजेच अगदी सुरूवातीला शिवाजीच्या डोक्यात केवळ आपल्या जहागिरीपुरत्या स्वातंत्र्याची मर्यादित स्वरूपाची संकल्पना होती. परंतु पुढे त्यांची ही संकल्पना हळूहळू विकसित होत गेली, असे पगडी यांचे मत आहे. त्याचे अधिक स्पष्टीकरण करताना ते म्हणतात......

"Shivaji's career thus takes the form of the pursuit of a vision - a vision small and limited in the beginning but growing wider and wider until it made a deep impress on the political situation of India." [२४]

शिवाजीने स्थापन केलेल्या स्वराज्याच्या कार्याला महाराष्ट्रातील संतांनी प्रेरणा दिल्याचे पुरावे कोठेच दिसून येत नाहीत. १४व्या आणि १५व्या शतकापासून ते १७व्या शतकापर्यंतच्या कालखंडात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांनी केवळ धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात महत्वाची कामगिरी करून हिंदू धर्म टिकवून ठेवण्यास मदत केली. संतमहंताच्या प्रयत्नाने नव्हे तर शिवाजीच्या कर्तृत्वातून मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याचा उगम झाला आहे, असे पगडी म्हणतात. पुणे जहागिरीतील सह्याद्रीच्या डोंगर दऱ्यातील स्वतंत्र वातावरणाचा व परिस्थितीचा बाल शिवाजीवर प्रभाव पडून त्यांच्यात स्वतंत्रतेची व स्वच्छंद प्रवृत्तीची जोपासना झाली. माता जिजाबाईने जाणीवपूर्वक केलेल्या

चांगल्या संस्कारामुळे शिवाजींचे व्यक्तीमत्व अत्यंत प्रभावी बनले आणि तिच्याच प्रेरणेतून परकीय सत्तेविरूध्द लढण्याची आणि त्यातून स्वत:चे राज्य निर्माण करण्याची प्रेरणा शिवाजीला लाभली. म्हणून शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात शहाजीराजांचा हातभार लागला असे आज तरी म्हणता येणार नाही, असे पगडी म्हणतात.

दि.१८ एप्रिल, १९८८ रोजी अहमदनगर येथे वासुदेव शास्त्री पणशीकर व्याख्यानमालेत बोलताना पगडी म्हणाले, "स्वराज्य निर्मितीत शहाजी राजांची प्रेरणा फार मोठी होती, हे म्हणणे चूक आहे. शहाजीराजांनी राज्यउभारणीच्या कार्यासाठी पत्नी व मुलाचा वियोग वीस वर्षे सहन केला होता, हे ही खोटे आहे. शहाजी आणि संभाजीला न्याय देण्याच्या भरात चरित्रकारांनी शिवाजीवर मोठा अन्याय केला आहे."[२५]

शिवाजी महाराजांबद्दल पगडी म्हणतात, "असामान्य प्रतिभा, काळवेळ ओळखून पावले टाकण्याची चतुराई, राजकीय हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांच्या जोडीस महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र - धर्म स्थापण्याच्या ध्येयावर सारखे लक्ष या अनेक गुणांचा संगम शिवाजीच्या ठिकाणी होता."[२६]

## जावळीच्या मोऱ्यांचे पारिपत्य

इ.स.१६५६ साली शिवाजीने जावळीच्या मोऱ्यांचे पारिपत्य करून विजापूरी आदिलशहाच्या ताब्यातील संपूर्ण जावळीचा प्रदेश जिंकून घेतला.

आदिलशहाची चाकरी करणाऱ्या मोरे सरदारांना आपल्याकडे वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न शिवाजीने करून पाहिला. दक्षिण आणि पूर्वेकडून आदिलशाही आणि उत्तरेकडून मोगल सत्तेच्या आक्रमण प्रसंगी स्वराज्याच्या रक्षणासाठी पश्चिमेकडील संपूर्ण कोकणचा प्रदेश स्वराज्याच्या नियंत्रणाखाली आणणे क्रमप्राप्त असल्याची जाणीव शिवाजीला असल्यामुळे आणि या ध्येयप्राप्तीच्या आड जावळीचे मोरे येत असल्यामुळे त्यांचे पारिपत्य करणे अपरिहार्य ठरले होते.

बखरी, इतर साधन साहित्यातील जावळी प्रकरणासंबंधीचा मजकूर परस्परविरोधी स्वरूपाचा असल्यामुळे एकूण प्रकरणाचे स्वरूप काय हे निश्चितपणे सांगणे कठीणच आहे. या संदर्भात पगडींनी जदुनाथ सरकारांचे मत खोडून स्वत:चे मत पुढीलप्रमाणे मांडले आहे.

''मोऱ्यांच्या प्रकरणी शिवाजी महाराजांनी कठोरपणा केला, यात शंकाच नाही. काटा काढला, जावळीवर हल्ला केला. बखरीत उलटसुलट गोष्टी आहेत. कल्पना अशी केली आहे की, रघुनाथ बल्लाळला पाठविले चंद्रराव मोऱ्यांच्याकडे, अंगणात एकांतात बोलतो म्हणून गेले आणि चंद्रराव आणि सूर्यराव यांच्यावर खंजीर चालविला. सर्व भंपकगिरी आहे. परमानंद हा समकालीन लेखक आहे. त्याने स्पष्ट लिहिले आहे की, जावळीला जाऊन महाराजांनी चंद्ररावांचा पाडाव केला आणि त्यानंतर शिवापूर यादीमध्ये आहे की, मोरे हे रायगडला पळून गेले. तेथे वेढा बसला. एप्रिल, १६५६ मध्ये परत आले. मुधोळकर घोरपड्यांबरोबर संगनमत केले. आदिलशहाला पत्रे लिहिली. त्यामुळे त्यांचा शिरच्छेद केला. मोरे यांना शिल्लक ठेवले नाही, ही गोष्ट खरी.'' [२७]

जावळी प्रकरणामुळे शिवाजीच्या राज्याच्या सीमा पश्चिमेला समुद्र किनाऱ्यापर्यंत, दक्षिण कोकणात कोल्हापूरपर्यंत आणि उत्तर कोकणात कल्याणच्या सीमेपर्यंत जाऊन भिडल्या. या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील इतर वतनदार-सरदारांवर शिवाजीचा वचक तर बसलाच, पण त्याचबरोबर शिवाजीच्या रूपाने विजापूरी आदिलशाही सत्तेला एक आव्हानच निर्माण झाले.

## अफझलखान वध प्रकरण

शिवाजीने स्वतंत्र प्रवृत्तीने स्वराज्याच्या स्थापनेसाठी सुरू केलेले कार्य म्हणजे आदिलशाही सत्तेचे वर्चस्व झुगारून देण्याचाच प्रकार होता. विजापूरच्या सत्तेच्या दृष्टीतून शिवाजी हा बंडखोर ठरला होता. शिवाजीचे हे बंड मोडून त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याचा निर्णय आदिलशाहाने घेतला. या कार्यासाठी विजापूर दरबाराने अफझलखान नावाच्या मातब्बर सरदाराची नियुक्ती करून इ.स.१६५९साली प्रचंड सैन्यानिशी त्याची रवानगी महाराष्ट्रात केली. यातूनच अफझलखान वधाचे प्रकरण उद्‌भवले.

विश्वासघात करून शिवाजीने अफझलखानाचा वध केला असा आरोप समकालीन फारसी ग्रंथातून वाचावयास मिळते. कवी परमानंदाचा आणि नव्यानेच प्रकाशात आलेल्या एका डच पत्राचा आधार घेऊन पगडींनी उपरोक्त आरोपाचे खंडण केले आहे. शिवाची महाराज आणि अफझलखान हे दोघेही मनात परस्परांविषयी कपटभाव बाळगून भेटले असा उल्लेख समकालीन कवी परमानंदाने केला आहे.

५ मे १६६० रोजी डचांनी वेंगुर्ल्याहून आपल्या मुख्य कचेरीला पाठविलेल्या पत्रात जो मजकूर आहे. त्यावरून असे स्पष्ट होते की विजापूरच्या दरबारातील एका श्रेष्ठ सरदाराने(नावाचा उल्लेख नाही) गुप्त संदेश पाठवून आपणास ठार मारण्यासाठी अफझलखानाला पाठविण्यात आले असल्याचा स्पष्ट इशारा देऊन शिवाजीस सावध केले होते. शिवाजीला सावधगिरीचा इशारा देणारा हा सरदार शिवाजीचा मित्र रूस्तमजमान तर नसावा ? असा संकेत पगडींनी दिला आहे.[२८]

मराठ्यांच्या इतिहासात ''अफझलखान वध प्रकरणाचे '' महत्व लक्षात घेऊन पगडींनी डच, फारसी, सभासद बखर, परमानंदाचे शिवभारत इत्यादी संबंधित साधनांचा सखोल अभ्यास करून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत आणि ते अत्यंत महत्वाचे वाटतात.

१) प्रसंग पाहून, संधी साधून आणि गोड बोलून महाराजांना ठार मारावे अशी स्पष्ट आज्ञा आदिलशहाकडून अफझलखानाला मिळाली होती.

२) ही बातमी त्यांना (शिवाजीला) विजापूर दरबारातील श्रेष्ठ सरदाराकडून कळली होती.

३) यामुळे आपणही संधी साधून अफझलखानाचा वध करावा, असे त्यानी ठरविले. तुमचे सगळे राज्य देऊन टाका अशा त्याच्या मागणीमुळे आणि तुळजापूरच्या देवीच्या अपमानाच्या बातमीमुळे त्यांच्या निर्धाराला बळकटी आली.

४) या मोहिमेत अफझलखानाने तुळजापूर, पंढरपूर येथील दैवते मोडली याला पुरावा नाही. पूर्वी नजीकच्या काळात तुळजापूरला त्याचा उपसर्ग झाला

असावा, परंतु त्याचा पुरावा नाही. कदाचित त्याच्या भितीने मूर्तीचे स्थलांतर करण्यात आले असावे.

५) अफझलखानाला जावळीत आणण्यात महाराजांच्या मुत्सद्दीगिरीची कमाल झाली. दोघेही मनात काही हेतू बाळगून परस्परांना भेटण्यास उत्सुक होते.

६) महाराजांनी सर्व प्रकारे आपली आणि आपल्या सैन्याची किती जय्यत तयारी केली होती, याची अफझलखानाला कल्पना आली नाही.

७) प्रत्यक्ष भेटीत खानाने पहिला वार केला. पण महाराजांच्या अंगातील चिलखतीमुळे वार वाया गेला. महाराजांनी वाघनखे आणि खंजीर चालवून त्याला प्राणांतिक जखम केली. पण त्यांनी तलवार चालविली नाही किंवा स्वत: त्याचा शिरच्छेद केला नाही. ते काम संभाजी कावजीने केले.

८) अफझलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर याने महाराजांवर वार केला नाही. वार करणारा अफझलखानाचा खिदमतगार सय्यद बंडा होता आणि महाराजांच्या हातून तो मेला नाही. पुढच्या धुमश्चक्रीत कृष्णाजी भास्कर मारला गेला

पण महाराजाच्या हातून नाही.[२९]

शिवाजी - अफझलखान भेट व खानाचा वध याबाबत पगडींनी वरीलप्रमाणे आपले निष्कर्ष काढलेले आढळतात.

मराठ्यांच्या इतिहासात अफझलखान घटनेचे काय महत्व आहे याची अतिशय मार्मिक चिकित्सा पगडींनी पुढीलप्रमाणे केलेली आहे.

'' आपण विचार करा. अफझलखान मारला गेला. त्यामुळे विजापूरचे राज्य त्याच दिवशी नष्ट झाले नाही. विजापूरचे राज्य १२ सप्टेंबर

१६८६ मध्ये ३० वर्षांनी नष्ट झाले. आणि ते मराठ्यांच्या हातून झाले नाही. मोगलांच्या हातून झालेले आहे. गेमेचे दोन पाय तोडले तर गोमेला काय कळणार आहे ? अफझलखानाचा "लॉस " हा जीवघेणा " लॉस " नाही. पण त्याच्या उलट विचार करा- शिवाजी महाराजांचे विपरीत झाले असते तर आज मराठीत मी बोलावयाला उभा राहिलो नसतो. तुम्ही माझ्यासमोर ऐकावयाला राहिला नसता. मराठे आणि महाराष्ट्र यांची अस्मिता जर खऱ्या अर्थाने जागृत झाली तर ती या प्रसंगानेच. महाराजांना आपल्या बळाची जाणीव झाली. आत्मविश्वास शंभर टक्के दुणावला. उंच झाला. " मी गगनाला गवसणी घालू शकेन" अशा प्रकारची जिद्द महाराजांच्यामध्ये निर्माण व्हायला ही एकमेव गोष्ट घडलेली आहे. त्यामुळे अफझलखानाचा वध ही मराठ्यांच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्वाची गोष्ट ठरलेली आहे. महाराष्ट्राचे राज्य १० नोव्हेंबरला (इ.स.१६५९) खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले." [३०]

## बजाजी निंबाळकरांच्या धर्मांतराची कथा

फलटणचा बजाजी निंबाळकर मुसलमान कसा झाला याची एक कथा सांगण्यात आली आहे. विजापूरच्या आदिलशहाने सन १६४१ साली बजाजीला पकडून विजापूरला नेले आणि तेथे त्याचे धर्मांतर केले. एवढेच नव्हे तर बादशहाने स्वत:च्या बेगम नावाच्या मुलीशी त्याचा विवाह लावून दिला. सन १६५१ मध्ये बजाजी फलटणला परत येतो आणि महादेवाच्या डोंगरावर मंदिरात स्वत:चे शुध्दीकरण करून घेतो. धर्मांतरीत बजाजी फलटणला परत

आल्यावर शिवाजी महाराजांनी त्याला शुध्द करून घेतले. त्यानंतर काही दिवसांनी शिवाजी महाराजांनी आपल्या सखुबाई या मुलीचा विवाह बजाजीचा मुलगा महादजी नाईकबरोबर लावून दिला आणि आंदण म्हणून महादजीला वाल्हेगावची पाटीलकी विकत घेऊन दिली.

या कथेत कसलाच ऐतिहासिक तथ्यांश नाही. या कथेचे खंडण करून याबाबतीत पगडींनी आपले मत मांडताना म्हटले आहे, '' वरील हकीकतीतील विपर्यास विलक्षण आहे. त्यावेळी विजापूरचा बादशहा महंमद आदिलशहा हा होता.त्याची कारकीर्द इ.स.१६२७ ते इ.स.१६५६ अशी होती. तो गादीवर आला तेव्हा म्हणजे इ.स.१६२७ मध्ये पंधरा वर्षाचा होता. इ.स.१६४१ मध्ये बजाजीचे धर्मांतर झाले असे मानल्यास त्यावेळी आदिलशहाचे वय अठ्ठावीस-एकोणतीस वर्षाचे होते. त्याला त्याच्या सतराव्या वर्षी मुलगी झाली असे म्हटले तरी ती इ.स.१६४१ मध्ये बारा वर्षाची असावी. तिचे लग्न म्हणे बजाजीशी करून देण्यात आले. मुलीचे नांव दिले नाही. फक्त तिला बेगम म्हटले आहे. समकालीन फारसी इतिहासात या मुलीचा पत्ता नाही. शिवभारत या परमानंदाच्या संस्कृत काव्यात बजाजीचा उल्लेख फलटणचा बाजराज असाच आला आहे. मुसलमानी नावाचा कुठेच उल्लेख नाही. इस्लाममध्ये धर्मांतराबरोबर नामांतर हे अपरिहार्य आहे. पुढे इ.स.१६५९ मध्ये अफझलखानाने बजाजीला पकडून त्याची सुंता करण्याची धमकी दिली आणि त्याच्याकडून साठ हजार होन घेऊन त्याला सोडून दिले. (शिवकालीन पत्रसारसंग्रह लेखांक ७९६ व ७९७) म्हणजे बजाजीची सुंता यापूर्वी झाली नव्हती हे सिध्द होते. असे असूनही त्याचे धर्मांतर आणि शुध्दीकरण यांच्या कथा इतिहास ग्रंथात आढळाव्या हे चमत्कारिक वाटते.''[३१]

बजाजी निंबाळकरांच्या धर्मांतराचे प्रकरण एक दंतकथा असून ही दंतकथा का निर्माण झाली असावी याबद्दल पगडींनी खुलासा दिला आहे. इब्राहिम आदिलशहाच्या सेवेत निंबाळकर नावाचा एक मराठा सरदार होता. त्याचे धर्मांतर होऊन त्याचे नांव दौलतयार असे ठेवण्यात आले. इब्राहिम आदिलशहाची त्याच्यावर विशेष मर्जी होती. इब्राहिम बादशहाच्या मृत्यूनंतर (इ.स.१६२७) त्याचा मोठा मुलगा दरवेश आलम याला बाजूला सारून लहान मुलगा महंमद यास विजापूरच्या गादीवर बसविण्यात याच दौलतयारचा मोठा वाटा होता. म्हणूनच गादीवर आलेल्या महंमद आदिलशहाने त्यास ''खवासखान'' ही पदवी दिली. बादशहाच्या विशेष मर्जीतील याच खवासखानाचे पुढे सात वर्षे विजापूर दरबारात आपली नियंत्रित सत्ता गाजविली. एकदा त्याने महंमद आदिलशहाच्या पुतणीबरोबर विवाह करण्याचो इच्छा व्यक्त केली होती. इ.स.१६३४ साली खवासखानाचा खून झाला.

आदिलशाही दरबारातील हा खवासखान पूर्वाश्रमीचा निंबाळकर याचीच हकीकत बजाजी निंबाळकर बरोबर निगडीत होवून बजाजीच्या धर्मांतराची दंतकथा प्रचारात आली असावी असे पगडींचे मत आहे.[३२]

## शायिस्ताखानावरील हल्ला

शिवाजी महाराजांच्या आयुष्यात अनेक रोमांचकारी प्रसंग आले. अफझलखान वध, शायिस्तेखानावरील छापा, आग्र्याहून सुटका, सुरतेच्या स्वारीत त्यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला अशा अनेक घटना होत्या.

शायिस्तेखानावरील छाप्यात त्यांनी स्वत: भाग घेऊन आपण आपले जीवित तृणप्राय मानतो हे दाखवून दिले.

औरंगजेबाच्या आज्ञेने शायिस्तेखान हा सुभेदार होऊन दक्षिणेत आला. याच्याजवळ सुमारे एक लाख सैन्य होते. खऱ्या अर्थाने मोगल-मराठा संघर्षाला येथूनच सुरूवात झाली, असे म्हणावयास हरकत नाही. शिवाजीच्या या हल्ल्याचा शाहिस्तेखान व मोगल सैनिकांवर जबरदस्त आघात होऊन त्यांच्यात शिवाजीची धास्तीच बसली. त्यांनी ताबडतोब पुणे सोडून औरंगाबादची वाट धरली. या घटनेमुळे संबंध भारतात शिवाजीच्या व्यक्तीमत्वाला प्रसिध्दी मिळून मोगलांची नाचक्की घडून आली. या घटनेमुळे मोगल बादशहा औरंगजेबाच्या मनात एक खोल जखम निर्माण झाली आणि तो भयानक खवळून उठला.

अनेक साधनांपैकी सभासद बखर, जेधे शकावली, भीमसेन सक्सेना आणि खाफीखान हीच या घटनेला जवळची साधने होत. ही साधने तपासून सेतु माधवराव पगडींनी पुढील निष्कर्ष मांडले आहेत.

१) छाप्यापूर्वी महाराजांनी शायिस्तेखानाच्या छावणीची आणि वाड्याची बित्तंबातमी काढली होती.

२) सैन्याची पथके त्यांनी छावणीबाहेर ठेवली. पुण्यात शिरताना त्यांच्याबरोबर दोन-तीनशेहून अधिक म णसे नसावीत. लग्नाच्या मिरवणुकीचे निमित्त करून मराठे पुण्यात शिरले. हे खाफीखानाचे विधान वस्तुनिष्ठ वाटते.

३) वाड्यात दहाहून अधिक, म्हणजे निदान शेपन्नास माणसे घुसली असावीत.

४) वाड्यात हल्लकल्लोळ उडवून दिल्यावर महाराज फार वेळ तेथे थांबले

नसावेत.सगळा प्रकार एखाद्या तासाच्या आत आटोपला असावा.

५) महाराज राजगडाहून आले ते जसवंतसिंगाच्या बाजारावरून पुण्यात आले. हल्ल्यानंतर ते नदीपार झाले असावेत आणि नंतर सोयीच्या वाटेन प्रथम सिंहगडला पोहोचले असावेत.

६) या हल्ल्यात खानाची चाळीस-पन्नास माणसे मारली गेली अगर जखमी झाली. मराठ्यांपैकी सहा ठार आणि चाळीस जखमी असा उल्लेख आढळतो.

७) महाराजांच्या सहकाऱ्यापैकी या हल्ल्याच्या संदर्भात फक्त पुढील पाच नावे आढळतात - चांदराव जेधे, कोयाची बांदल, सर्जेराव जेधे, बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी.

८) मोगलांना या हल्ल्यामागे जसवंतसिंग असला पाहिजे असा संशय आला.(तो खरा वाटत नाही.)

९) या हल्ल्यामुळे शायिस्तेखानाची नाचक्की झालीच. शिवाय महाराजांचे नाव हिंदुस्थानभर पसरले.मोगलांना मराठ्यांची धास्ती वाटू लागली.

१०) शायिस्तेखानची ताबडतोब बंगालकडे बदली करण्यात आली.[३३]

## सुरतेची लूट

शिवाजी महाराजांनी आणखी एक प्रचंड धाडस केले ते म्हणजे सुरतेवर हल्ला. ६ जानेवारी ते १० जानेवारी, चार दिवस. बुधवार, गुरूवार, शुक्रवार, शनिवार. महाराजांनी सुरतेची पहिल्यांदा लूट केली.

शाहिस्तेखानाने महाराष्ट्रभर थैमान माजवून मोठ्या

प्रमाणात नासधूस केली होती. झालेले हे नुकसान कुठून तरी भरून काढणे आणि मोगलांनी माजविलेल्या उत्पाताला कोठे तरी प्रत्युत्तर देणे आवश्यक होते. याच विचारातून शिवाजी महाराजांनी सुरत शहरावरील आक्रमण व त्या शहराच्या लूटीची योजना अंमलात आणली. सुरत लूटीत शिवाजीला अदमासे १ कोटी रूपयांची संपत्ती प्राप्त झाली आणि यातूनच शिवाजीने किल्ले बांधले व नव्याने मराठा सैन्याची उभारणी केली. या सुरत लूटीबद्दल इंग्रज इतिहासकारांनी शिवाजीला लूटारू म्हटले आहे.

पण सुरतच्या लूटीने शिवाजीराजे श्रीमंत तर झालेच.पण मोगलांनी तत्पूर्वी शिवाजीच्या प्रदेशाची जी नासधूस केली होती तिचा एक प्रकारे बदलाच घेतला आणि सुरत लूटीमागे शिवाजीचा हाच हेतू होता असा विचार पगडींनी मांडला आहे.[३४]

## शिवाजीची आग्रा भेट

शिवाजी आपल्याला फार मोठे आव्हान बनत चालल्याची तीव्र जाणीव औरंगजेबाला होवून त्याने शिवाजीचा नि:पात करण्याची जबाबदारी रजपूत सरदार मिर्झाराजे जयसिंगावर टाकून प्रचंड सैन्य, संपत्ती व सत्तेसहित त्यांची रवानगी दक्षिण भारतात केली. त्याने शिवाजीच्या हालचालींना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. विविध मार्गांचा अवलंब करून स्वराज्यात विध्वंस सुरू केला. शिवाजी महाराज हे सर्व बाजूंनी अडचणीत आले होते. परिणामत: स्वराज्यातील जनतेचे होत असलेले हाल थांबविण्यासाठी शिवाजीला जयसिंगापुढे शरण जावे लागले. शिवाजी महाराजांनी आग्रा येथे जाऊन औरंगजेबाची भेट

घ्यावी असा आग्रह जयसिंगाने शिवाजीकडे धरला. ५ मार्च, १६६६ रोजी शिवाजी महाराज आग्र्याला रवाना झाले. औरंगजेबाच्या वाढदिवसानिमित्त दि.१२ मे,१६६६ रोजी आग्रा येथे बादशहाचा भव्य दरबार भरला होता. तशाप्रसंगी शिवाजी महाराजांचा औरंगजेबाच्या दरबारात प्रवेश होतो. अनपेक्षितपणे व जाणीवपूर्वक शिवाजी महाराजांना बादशाही दरबारात अपमानाची वागणूक देण्यात आली. स्वाभिमानी शिवाजीराजांना त्यांचा झालेला तो अपमान असह्य होवून ते तावातावाने दाराबाहेर पडतात. त्यांची समजूत घालण्याचा रामसिंगाने केलेला प्रयत्न फोल ठरला. कुटील स्वभावाच्या बादशहा औरंगजेबाने शिवाजीवर नजरकैद बसविली आणि पुढे हळूहळू आग्रा येथील शिवाजीचे निवासस्थान म्हणजे एक तुरूंगच बनले आणि त्यात राहणारे शिवाजी व संभाजी औरंगजेबाचे कैदी बनले.

आग्रा येथे बादशहा औरंगजेबाच्या दरबारात अपमानित झालेल्या शिवाजी महाराजांनी कसल्याही परिणाम्ांची तमा न बाळगता जे वर्तन केले ते त्यांच्या स्वाभिमानाचे व धाडसाचे प्रतीकच ठरते. म्हणूनच या संदर्भात पगडींनी पुढीलप्रमाणे केलेले विवेचन योग्यच ठरते.

'' पण भारताचा इतिहास त्या एका प्रसंगाने बदलून गेला. पहिली गोष्ट, मोगलांचे साम्राज्य त्या वेळेला पराकोटीला पोहोचलेले, त्यांचा वैभवसूर्य अगदी मध्यान्हीला आहे. २२ सुभ्यांचे औरंगजेबाचे साम्राज्य, औरंगजेबाचा वाढदिवस, आग्र्याची राजधानी आणि सात हजारी मनसबदार, राजे राजवाडे यांच्या समोर भर दरबारामध्ये एक मनुष्य येतो आणि औरंगजेबाकडे पाठ फिरवून निघून जात अस्ताना तो बोलतो की, 'हा अपमान मला सहन

होणार नाही. ' हे चित्र इतके दणदणीत आहे. इतके रोमांचकारी आहे की मराठ्यांच्या इतिहासामध्ये काय, भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे. यालाच स्वाभिमान म्हणतात. '' [३५]

मुत्सद्देगिरीच्या बाबतीत इथे शिवाजी महाराजांनी प्रत्यक्ष बादशहा औरंगजेबावरच मात केली आणि अत्यंत कल्पकतेने औरंगजेबाच्या तावडीतून पुत्रासहित स्वत:ची सुटका करून घेतली. औरंगजेबासहित हजारो मोगल सैनिकांच्या डोळ्यात धूळफेक करून शिवाजी महाराज १७ ऑगस्ट१६६६ रोजी आग्र्याहून निसटले.

एका मोगल हेराच्या वृत्तान्तात महाराज हे आग्र्याहून सुटून पंचवीस दिवसात म्हणजे बारा सप्टेंबरला राजगडला पोहचले असे आहे. परंतु पगडींच्या मते, ''महाराज, हे मथुरा, प्रयाग, काशी, बुंदेलखंड, गोंडवन, चांदा, पश्चिम आंध्र असे करीत राजगडला वीस नोव्हेंबर रोजी पोहोचले.''[३६]

संपूर्ण भारताच्या इतिहासात '' शिवाजीच्या आग्रा-भेट'' प्रसंगाचे महत्व पगडींनी पुढीलप्रमाणे विशद केले आहे.

'' निर्णय घेण्यात कधी न कचरणारा औरंगजेब यावेळी जरा विलंब लावतो व तेवढ्याने इतिहास बदलतो. पुढे सतत २७ वर्षे मराठ्यांशी त्याला झगडावे लागले आहे. इ.स.१७०७ मध्ये मृत्यूपूर्वी आपल्या मुलाला उपदेश करताना या प्रसंगाची आठवण ठेवून तो सांगतो की, '' कोणत्याही गोष्टीला क्षुल्लक समजू नको.'' वयाच्या ८८व्या वर्षी औरंगजेबाने काढलेले उद्‌गार आहेत. महाराजांच्या दृष्टीनेही हा प्रसंग अनन्यसाधारण होय. '' [३७]

अशा प्रकारे शिवचरित्रातील आग्रा भेट प्रकरणाचे पगडींनी

केलेले विवेचन अत्यंत मार्मिक स्वरूपाचे आहे.

## शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे महत्व

६ जून १६७४रोजी रायगडावर शिवाजी महाराजांनी धार्मिक रीतीरिवाजाप्रमाणे स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला आणि त्यातून कायदेशीर पध्दतीने शिवाजीचे हिंदवी स्वराज्य अस्तित्वात आले.

शिवाजी महाराजांना स्वत:चा राज्याभिषेक करून घेण्याची निकड का भासली याचे विश्लेषण पगडींनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''इ.स. १६४७पासून महाराजांनी स्वराज्यनिर्मितीच्या ध्येयाला स्वत:ला वाहून घेतले होते. विजापूरचे आदिलशहा, गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचे सिद्दी आणि दिल्लीचे मोगल बादशहा यांच्याशी सतत संघर्ष करून त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले होते. सुमारे पंचवीस हजार चौरस मैलांचा प्रदेश स्वराज्यात समाविष्ट झाला होता. साहस, रणकौशल्य, राजकारणपटूता इत्यादी गुणांच्या बळावर या असामान्य वीराने साऱ्या भारताचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते...... हे सगळे झाले तरी अद्यापपर्यंत महाराज हे विजापूर राज्याचे जहागीरदार आणि मोगलांचे प्रजानन म्हणविले जात. मोगल, विजापूरकर, इंग्रज आणि पोर्तुगीज हे महाराजांचा उल्लेख '' बंडखोर'' असा करीत. कारण मोगल साम्राज्य हे कायद्याने स्थापन झालेले साम्राज्य होय, अशी त्यांची कल्पना होती. याशिवाय महाराजांच्या पराक्रमासमोर नमलेले असतानाही विजापूरकर आणि मोगल यांचे मराठा सरदार हे महाराजांना उपरे समजत. फार

तर महाराज हे आपल्यासारखे मोगलांचे एक सरदार अशी त्यांची भूमिका होती. वरील कारणांनी महाराजांचा राज्याभिषेक आणि स्वतंत्र मराठी राज्य स्थापन झाल्याची घोषणा ही त्या काळाची एक मोठीच निकड होती.''[३८]

## शिवाजीची कर्नाटक मोहिम

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:च्या राज्याभिषेकानंतर इ.स.१६७५ मध्ये कर्नाटक मोहिमेची योजना आखली. शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेच्या उद्देशाबाबत इतर इतिहासकारांनी जी मते मांडली आहेत त्याबाबत पगडींचे मतभेद आहेत. विशेषत: सर जदुनाथ सरकार आणि शेजवलकरांनी शिवाजीच्या कर्नाटक स्वारीबाबत मांडलेली मते पगडींनी खोडून काढण्याचा प्रयत्न केला. कर्नाटक स्वारीचा मुख्य उद्देश लूट मिळविणे हा होता, असे सर जदुनाथ सांगतात. सरकारांच्या या मतांचे खंडण करताना पगडी लिहितात.

'' या विधानाला उत्तर हेच की शिवाजीने या स्वारीत विजापूरकरांच्या दहा हजार चौरस मैलांचा जिंजी वेलूर हा प्रदेश कायमचा आपल्या ताब्यात आणला. य़ावरून विजापूर राज्याचा तो भाग जिंकून घेणे हे शिवाजीचे उद्दीष्ट होते, हे स्पष्ट होते.''[३९]

शेजवलकरांचे मत सरकारांपेक्षा भिन्न आहे. शिवाजीच्या कर्नाटक मोहिमेचा हेतू शेजवलकरांनी पुढील प्रमाणे मांडला.

" शिवाजीचा हेतू स्वत:स राज्याभिषेक करून घेतल्यापासून असा होता की, पूर्वीच्या नष्ट झालेल्या विजयनगर साम्राज्याचे पुनरूज्जीवन आपण केले आहे असा भास दक्षिणेतील सर्व हिंदूना निर्माण करावा म्हणजे त्यांचा उपयोग आपणास उत्तरेकडून येणाऱ्या मोगलांशी लढताना अवश्य होईल. हे इष्ट काम व्यंकोजीने शिरावर घेतले नाही. तेव्हा शिवाजीने ते स्वत: तडीस नेण्याचे योजून प्रस्तुत कर्नाटकची स्वारी काढली."[४०]

शेजवलकरांचे मत खोडून स्वत:च्या मताचे प्रतिपादन करतांना पगडी लिहितात.

" ही केवळ कल्पनेची भरारी म्हटली पाहिजे......वरील विधानांना पुरावा नसल्यामुळे ती मान्य करणे कठीण आहे. शिवाजी महाराजांचा सरळ हेतू दक्षिणेतील विजापूर राज्याचा लचका कायमचा तोडावा हाच होता.त्याला फार मोठा तात्विक बैठकीचा डोलारा उभा करण्याची आवश्यकता नाही. मदुरा वगैरेचे नायक बाह्यत: तरी भोसल्यांच्या राज्यात येतील आणि ते ही विजयनगरची राजधानी वेलूर ताब्यात आल्याने, असे विधान अतिशयोक्तीपूर्ण वाटते. हे नायक विजयनगरमधून फुटून कधीचेच स्वतंत्र झाले होते.याची वाट काय ? उत्तरेकहून येणारे मोगल पाऊणशे वर्षापासून तीन चतुर्थांश महाराष्ट्रावर अधिपत्य गाजवित होते हे विसरून चालणार नाही. गोवळकोंडा आणि विजापूर ही राज्ये त्यांची मांडलिक होती हे ही स्पष्ट आहे." [४१]

इ.स.१६७८ मध्ये शिवाजी महाराज दक्षिणेत यशस्वी होवून स्वराज्यात परत आल्याबरोबर त्यांच्यासमोर दोन महत्वाच्या समस्या उभ्या होत्या.

एक संभाजी मोगलांना जाऊन मिळाल्यामुळे निर्माण झालेले संकट आणि दुसरे म्हणजे मोगलांनी दक्षिणेत उघडलेली लष्करी मोहिम.

मोगलांना जाऊन मिळालेल्या राजपुत्र संभाजीला परत आणण्यासाठी शिवाजी महाराजांनी भरपूर प्रयत्न केले. या प्रकरणामुळे शिवाजी राजे मनातून खचून गेल्यास नवल नाही. अशाही परिस्थितीत आपल्या कौटुंबिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करून शिवाजीराजांनी मोगलांच्या विरूध्द चौफेर मोहिमा सुरु केल्या. मोगलाना हैराण करून सोडले होते. इ.स.१६७९ च्या शेवटी जालन्यावर आक्रमण करून ते शहर लूटले व ते वेगाने रायगडला परतले. शिवाजी महाराजांची प्रकृती अचानक बिघडली. अनेक प्रकारचे उपचार करूनही त्यांची प्रकृती सुधारण्याऐवजी दिवसेंदिवस खालावतच गेली. आणि रूद्र संवत्सर, चैत्र शुध्द पौर्णिमा, शके १६०२ म्हणजेच रविवार, ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांनी या जगाचा निरोप घेतला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याची स्तुती व मूल्यमापन बहुतेक सर्व मराठी इतिहासकारांनी केलेले आहे.इतिहासकार पगडींनी सुध्दा शिवाजीच्या जीवन व कार्याचे मूल्यमापन केले आहे. ते पुढील अभिप्राय व्यक्त करतात.

" इतक्या लहान वयात या पुण्यश्लोक राजाने भारतीय इतिहासात कितीतरी मोठी क्रांती घडवून आणली. गेली अनेक शतके चालत आलेली भारतातील राजकीय विषमता त्यानी काळाचे आव्हान स्वीकारून बदलून टाकली." विश्व स्वधर्म सूर्ये पाहो" हा ज्ञानेश्वरांचा मंत्र त्यांनी सार्थ करून दाखविला. आपल्या धर्माशी दृढ राहून इतर धर्माचा आदर करणारा, असहिष्णुतेला

सतत आव्हान देणारा, शिस्तीचा भोक्ता पण गुणांची कदर करणारा, रणशूर परंतु पापभीरू, न्यायनिष्ठूर पण दयाळू अंत:करणाचा, कोणत्याही प्रसंगात न डगमगणारा असा हा थोर पुरूष भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासातील महानता व अमरत्व पावलेला महामानव. त्याने राष्ट्र घडविले आणि सामान्य माणसांचे वीरपुरूष बनवले. त्यांच्या या कार्यामुळे पुढील पंचवीस वर्षाच्या मोगल आक्रमणाच्या महासंकटातून महाराष्ट्र सुरक्षितपणे बाहेर पडला. इतकेच नव्हे तर पुढील पन्नास वर्षात मोगल साम्राज्य संपुष्टात आणून त्याने भारताचा इतिहास आणि नकाशाही बदलून टाकला.''[४२]

## संभाजीची प्रतिमा उजेडात आणण्याचा प्रयत्न

मराठी बखरी आणि फारसी कागदपत्रांतून संभाजी राजांच्या व्यक्तीमत्वावर दोषारोप करणारी माहिती आढळून येते. पगडींनी आपल्या लिखाणातून व व्याख्यानातून संभाजी राजांच्या चरित्राचे विश्लेषण व विवेचन करून त्यांचे वास्तव चरित्र लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. संभाजी राजांचे महत्व सांगत असताना संभाजीच्या व्यक्तीमत्वातील दोषही दाखवून देण्याचा प्रयत्न पगडी यांनी केला. संभाजीच्या ऐतिहासिक कामगिरीला न्याय मिळाला पाहिजे, हा दृष्टीकोन पगडींनी बाळगला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे जेष्ठ पुत्र संभाजी यांना छत्रपतीची गादी सहज मिळाली नाही. त्यांच्याविरूध्द मोठा

राजकीय कट चालला होता. तो कट उद्ध्वस्त करूनच त्यांना छत्रपती बनता आले. संभाजीला स्वत:च्या घरातच मोठ्या प्रमाणात विरोध झाला. या विरोधाला तोंड देत मोगलांच्या व पोर्तुगीजांच्या प्रचंड शक्तीला सामोरे जावून संघर्ष करण्याचे जे धाडस संभाजीने दाखविले आहे त्याला इतिहासात तोड नाही.

संभाजी राजांची कारकीर्द (इ.स.१६८० ते १६८९ ) अवघी ९वर्षाची असली तरी ती संपूर्णत: त्यांच्या साहस, धाडस व शत्रूविरूद्ध केलेल्या संघर्षाने खच्चून भरलेली आहे. तेवीस वर्षाचा संभाजी गादीवर येतो न येतो तोच दोन लाख सैन्य घेऊन औरंगजेब स्वत: महाराष्ट्रात उतरला. या चिमुकल्या राज्यावर अक्षरश: आभाळ फाटले.[४३]

संभाजीसंबंधी अनेक दंतकथा पसरल्या आहेत. संभाजी राजे व्यसनी होते. त्यांनी नाटकशाळा बाळगल्या. ते चैनी-विलासी आणि निष्क्रीय होते. म्हणूनच ते शत्रूंच्या हाती पडले असे एक नव्हे अनेक दोष त्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न झाला. जीवदान व सुटकेसाठी धर्मांतराचे आमिष संभाजीला दाखविले गेले. संभाजीने त्यासाठी बादशहाच्या मुलीची मागणी केली. इत्यादी कथा संभाजी चरित्रात घुसडल्याचे दिसून येते. अशा भाकड कथांचे खंडण करताना पगडी म्हणतात.

‘‘ सारांश, या गोष्टी धादांत खोट्या आहेत. बादशहाच्या स्त्रिया काय किंवा मुली काय, कडक पडद्यात असत. शिवाय मृत्यूच्यावेळी संभाजीचे वय ३२ तर जिनतुन्निसा पन्नाशीच्या घरात अशा स्थितीत संभाजी औरंगजेबाच्या मुलीची मागणी करणारच कसा ? हे प्रकरण संभाजीला बदनाम करणाऱ्या अभ्यासकांनी दंतकथेच्या आधारे किंवा काल्पनिक रचलेले दिसते.

त्यात सत्याचा अंश नाही.'' [४४]

छत्रपती संभाजीराजांच्या चारित्र्यावर कितीही शिंतोडे उडविले गेले असले तरी त्यांचे ऐतिहासिक कार्य निश्चितच नगण्य ठरत नाही. उलट, अत्यंत अल्पावधीत संभाजीराजांनी छत्रपती या नात्याने जे कार्य केले आहे त्याची प्रचंड छाप मराठ्यांच्या इतिहासावर पडल्याशिवाय राहिली नाही. त्या संदर्भात पगडींनी पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे.

''संभाजीच्या हौतात्म्याने महाराष्ट्रात प्रचंड शक्ती निर्माण झाली. मराठ्यांनी पुढे अठरा वर्षेपर्यंत मोगलांशी निकराची झुंज देऊन औरंगजेबाची स्वप्ने धुळीस मिळवली. रगेल तसाच रंगेल, धाडसी, शूर, स्वाभिमानी, कच खाण्याची भाषा कधीच न काढणारा आणि शेवटच्या क्षणापर्यंत आपली मान ताठ ठेवणारा हा मराठ्यांचा लाडका राजा संभाजी अखिल राष्ट्राचे दैवत बनावा यात काही आश्चर्य नाही.'' [४५]

## मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द

मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द इ.स.१६८१ ते इ.स.१७०७ पर्यंत चालू होते. ज्यावर्षी (इ.स.१६८१) औरंगजेब दक्षिणेत उतरला त्या वर्षापासूनच मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द सुरू झाले, असे पगडींचे म्हणणे आहे. म्हणजेच संभाजी राजांची कारकीर्द सुध्दा मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात मोडते.

संपूर्ण मराठी इतिहासात मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाचे महत्व

अनन्यसाधारण आहे.

इ.स.१६८१ मध्ये औरंगजेब दक्षिणेत उतरला. तब्बल पंचवीस वर्षे त्याने मराठ्यांना नेस्तनाभूत करण्यासाठी जंगजंग पछाडले.

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाचे ऐतिहासिक महत्व काय आणि किती आहे याचे समर्पक विश्लेषण पगडींनी पुढीलप्रमाणे केलेले आहे. पगडी म्हणतात......

" हा पंचवीस वर्षाचा मराठ्यांचा स्वातंत्र्ययुध्दाचा काळ हा महाराष्ट्राच्या , किंबहुना भारताच्या इतिहासातील अत्यंत स्फूर्तीदायक काळ होय. पुढे अठराव्या शतकात मराठे अटकेपर्यंत पोहोचले. त्या पराक्रमाचे स्वरूप अत्यंत वैभवशाली होते. पण प्रत्यक्ष घरात औरंगजेबासारखा शत्रू दोन लाख सैन्यानिशी पंचवीस वर्षेपर्यंत सारखा थैमान घालीत असता त्याचा प्रतिकार करून, त्याला दमवून, हैराण करून आणि शेवटी त्याचा निकाल लावून मोगल साम्राज्य खिळखिळे करून सोडणे हे सामान्य काम नव्हे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही पंचवीस वर्षे म्हणजे महाराष्ट्राच्या आणि भारताच्या स्फूर्तीचा अखंड झरा होय."[४६]

भारताच्या मध्ययुगीन काळात मराठ्यांनी जो काही इतिहास घडविला त्याबद्दल आजपर्यंत वेगवेगळ्या विद्वानांनी आपआपल्या परीने चिकित्सा केलेली आहे. काहींनी मराठ्यांमधील दोष दाखवण्याचा प्रयत्न केला तर काहीनी मराठ्यांची तोंड भरून स्तुती केल्याचे दिसून येते. संपूर्ण देशाच्या इतिहासाच्या दृष्टीने मराठ्यांची कामगिरी किती मोलाची ठरली आहे. याचे

साररूपी विवेचन पगडींनी पुढीलप्रमाणे केले असून त्यातून पगडींची इतिहास मीमांसा अत्यंत वस्तुनिष्ठ व अर्थपूर्ण असल्याचे आढळून येते. ते लिहितात,

" मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करतांना एक गोष्ट ठळकपणे नजरेत भरते ती अशी की, धर्म राजकारणासमवेत चालतो ही उक्ती मराठ्यांच्या राजकीय आणि सांस्कृतिक हालचालींस अचूकपणे लागू पडते. मराठ्यांनी सततच्या परिश्रमांनी भारताच्या बहुतेक भागावर आपली सत्ता बसविली. हरियाणापासून तुंगभद्रेपर्यंत आणि ओरिसापासून सौराष्ट्रापर्यंत त्यांची सत्ता पसरली होती. त्याबरोबर देशाच्या सांस्कृतिक अभ्युत्थानाकडे त्यांनी सतत लक्ष दिले. विकलांग देशाला त्यानी खऱ्याखुऱ्या अर्थाने सुदृढ अवयव पुरविले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. जुन्या देवालयाचा जिर्णोध्दार, नूतन देवालयाची बांधणी, धर्मशाळा, घाट, अन्नछत्रे, सदावर्ते, मठ, पाठशाळा इत्यादींच्या निर्मितीकडे आणि प्रगतीकडे त्यांनी पुरेपूर लक्ष दिले. नावाजलेली धर्मक्षेत्रे आपल्या सत्तेखाली आणण्याची धडपड केली. मराठ्यांच्या इतिहासातील ही सोनेरी पाने सहज अभ्यास करणाऱ्याच्याही लक्षात येण्यासारखी आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या साध्वीने देवालयाची निर्मिती आणि जिर्णोध्दार या कार्यक्रमाने सर्व हिंदुस्थान जोडला. अहिल्याबाईनी पुण्याच्या कोटी कोटी राशी जोडल्या आणि मराठ्यांच्या इतिहासाला कधीही न ढळणारे नैतिक अधिष्ठान मिळवून दिले."[४७]

# तंजावरच्या भोसले घराण्याची दुर्मिळ हकीकत

महाराष्ट्राच्या इतिहासात तीन भोसले घराणी मशहूर आहेत. एक म्हणजे शिवाजी महाराजांनी अजरामर केलेले, दुसरे म्हणजे नागपूरकर रघुजी भोसल्यांचे आणि तिसरे महाराष्ट्राबाहेर दक्षिणेतील तंजावरमध्ये जाऊन वसलेले.

तंजावर येथे एक भोसले घराणे जवळ जवळ दीडशे वर्षे आपले एक राज्य स्थापून राहिले होते. याबद्दलची हकीकत आजवर बरीचशी अंधारात होती. इतिहासाकडे पाहण्याच्या वाढत्या उदासीन वृत्तीमुळे या इतिहासावर पडावा तसा प्रकाश पडलेला नाही. म्हणूनच सेतुमाधवराव पगडींनी यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांनी प्रकाशात आणलेल्या बहुविध माहितीवरून तंजावरच्या भोसले घराण्याने तिथे मोठा इतिहास घडविलेला नाही, परंतु विद्वत्तेला आणि कलेला मोठा वाव देवून तंजावर राज्याला यक्षनगरीचे स्वरूप प्राप्त करून दिले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

तामिळनाडूमधील जिंजीचा किल्ला मोगलांनी इ.स.१६९८ मध्ये मराठ्यांकडून् जिंकून घेतला. त्यामुळे राजाराम महाराजांना महाराष्ट्रात परत यावे लागले. त्यापूर्वी २०-२२ वर्षे शिवाजीचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे यांनी इ.स.१६७६ मध्ये तंजावर येथे मराठी राज्याची स्थापना केली होती. तंजावरचे हे मराठी राज्य इ.स.१८०० पर्यंत स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात होते. [४८]

व्यंकोजीचा मुलगा ( दासीपुत्र ) रायभान भोसले याला मोगल - मराठा संघर्षात मध्यस्थी करण्यासाठी औरंगजेबाने बोलावणे पाठविले होते. रायभान हा पुणे मुक्कामी औरंगजेबाला भेटला. रायभानच्या सहकाऱ्यांची नावे मोगल दरबारच्या बातमीपत्रात आली आहेत.

साहित्य, कला आणि वाङमय ह्या क्षेत्रात तंजावरच्या भोसल्यांनी केलेली कामगिरी अजोड आहे. तंजावरचे राजे हे विद्वान, धार्मिक बाबतीत उदारमतवादी आणि विद्वानांचे आश्रयदाते असल्यामुळे त्याच काळात धर्म, शास्त्र, कला, साहित्य इत्यादी क्षेत्रांत तंजावरचे नांव भारतभर प्रसिध्द झाले.[४९]

## मराठे-निजाम संबंध

इ.स.१७२४ मध्ये मीर कमरूद्दीन चिन्‌कलीजखान निजामुलमुल्क याने हैदराबाद राज्याची स्थापना केली. हैदराबादच्या निजाम घराण्याची सुरूवात इ.स.१७२४ ला होते, कारण त्या सालानंतर निजामाच्या कारभारात दिल्लीच्या केंद्रीय सत्तेने हस्तक्षेप करण्याचे सोडून दिले.

इ.स.१७२४ पासून इ.स.१८०० पर्यंत निजामाचा मराठ्यांशी निकटचा संबंध आला. या काळात निजामाच्या गादीवर निजामुलमुल्क, नासिरजंग, मुजफ्फरजंग, सलाबतजंग आणि निजामअलीखान बसले. या काळात पेशवाईत पहिला बाजीराव, नानासाहेब, माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव आणि दुसरा बाजीराव हे राज्यकर्ते होऊन गेले.

मराठे-निजाम राजकारणात वावरणारे मराठे सरदार खालीलप्रमाणे होते.

१) जाधव २) सुल्तानजी निंबाळकर ३) खंडागळे

४) विठ्ठल सुंदर ५) रावरंभा निंबाळकर ६) राजेरायराया

७) राजे रघोत्तमराव ८) राजे नेमवंतवाले

मराठेशाहीतून फक्त चंद्रसेन जाधव आणि सुल्तानजी निंबाळकर हे निजामाला मिळाले. त्र्यंबकराव दाभाडे, दमाजी गायकवाड, जानोजी भोसले यांनी निजामाबरोबर कारस्थाने केली. पण त्यांनी निजामाची चाकरी पत्करली नाही.[५०]

मराठेशाही होती तोपर्यंत निजामाच्या दरबारात मराठे सरदारांचे वजन होते. इंग्रजांनी निजामाला आपल्या रक्षणाखाली घेतल्यानंतर (इ.स.१८००) निजामाला आपल्या मराठे सरदारांबद्दल आस्था राहिली नाही आणि ती घराणी निस्तेज बनली.

इ.स.१८०२ च्या सुमारास हिंदुस्थानचा निम्मा अधिक भाग मराठ्यांच्या ताब्यात आला होता. साधारणपणे मुंबई राज्य ( मराठवाडा वगळून पण उत्तर कर्नाटकातील जिल्हे धरून ) मध्य प्रदेश, राजस्थान, ओरिसा, पश्चिम उत्तरप्रदेश, दिल्ली आणि पूर्व पंजाबचा काही भाग म्हणजे सुमारे सहा लाख चौरस मैलांचा प्रदेश मराठ्यांच्या अधिपत्याखाली होता. मराठ्यांशी संग्राम केल्याशिवाय इंग्रजांचे राज्य स्थिर झाले नाही. यावरून मराठ्यांचे अठराव्या शतकांतील महत्व दिसून येते.[५१]

८ मे, १९५३ रोजी हैदराबाद येथे मराठवाडा साहित्य

परिषदेचे पाचवे अधिवेशन भरले. परिषदेचे अध्यक्षपद सेतुमाधवरावांना देण्यात आले होते, या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात,

''इ.स.१९३७ मध्ये मराठवाडा साहित्य परिषद स्थापन झाल्यापासून आतापर्यंत अवघी चारच अधिवेशने भरावीत यावरूनच त्या काळात मराठी भाषेच्या जोपासनेला आणि संवर्धनाला किती अडचणी येत होत्या याची कल्पना येईल. मराठवाड्यातील साहित्याची गती ही मराठवाड्यातील गेल्या दीडशे वर्षाच्या समाजस्थितीची निदर्शक आहे. इ.स.१७२४ मध्ये दक्षिणेत राजकीय क्रांती होवून एका स्वतंत्र राजवटीची जेव्हा स्थापना झाली, तेव्हापासूनचा काळ घेतला तर महाराष्ट्रातील मराठ्यांच्या चढत्या आणि उतरत्या वैभवास अनुसरूनच मराठवाड्यातील समाजाचे महत्व कमी अगर अधिक होते. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत निजामाच्या राज्यात, अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत तरी वऱ्हाड, महाराष्ट्रातील नगर, नाशिक, सोलापूर, पूर्व व पश्चिम खानदेश या भागांचाही समावेश होत असल्यामुळे या राजवटीतील महाराष्ट्रीय जनता ही बहुसंख्य होती हे उघड आहे. अठराव्या शतकात निजामाचे मराठ्यांशी हर्षामहर्षाचे अनेक प्रसंग उद्भवले. त्यामुळे निजाम राज्यातील मराठे सरदार, शिपाई, मुत्सद्दी व इतर गुणी माणसांची कदर करणे हे निजामी राज्यकर्त्यांना आवश्यक होवून बसले. दक्षिणेत मराठे हे जमीनदार आहेत त्यांना कोणत्याही प्रकारे दुखवू नये अशा प्रकारचा आदेश निजामुलमुल्क आसफजहा याने आपला मुलगा नासिरजंग यास दिल्याचे प्रसिध्द आहे. सतराशे चोवीस ते अठराशे या कालखंडात मराठ्यांचे वजन दक्षिणेच्या दरबारात किती होते याची साक्ष अनेक सरदार घराणी देतात.''[५२]

औरंगाबादेत निजामाच्या अनेक सरदारांनी या काळात वाडे आणि हवेल्या बांधल्या. औरंगाबाद शहर इ.स.१७६७ पर्यंत निजामाच्या राजधानीचे शहर होते. राक्षसभुवननंतर मराठ्यापासून दूर असलेलेच बरे, असे समजून राज्याचे मुख्य ठिकाण हैद्राबादला नेण्यात आले. तेव्हापासून औरंगाबादेस दुय्यम दर्जा प्राप्त झाला. तरीही औरंगाबाद या शहराला ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्व आहे.

इ.स.१६८२ मध्ये मराठ्यांच्या वाढत्या आक्रमणाला आळा घालण्यासाठी औरंगजेबाच्या आज्ञेने शहराभोवती चार मैल लांबीची तटबंदी अवघ्या चार महिन्यात बांधण्यात आली. तिला तीन लाख रूपये खर्च आला. या तटबंदीचे दिल्ली, पैठण, रोशन, जफर असे अनेक दरवाजे अद्याप शाबूत आहेत.[५३]

मोगलांचे महत्वाचे केंद्र म्हणून औरंगाबादेस या काळात अनेक विद्वान, कवी, साहित्यिक, सूफी आणि साधू आकृष्ट झाले.

१८ व्या शतकामध्ये मराठ्यांची सत्ता छत्रपतींकडून त्यांच्या मुख्य प्रधानाकडे व प्रधानाकडून फडातील एका कारभाऱ्याकडे गेली. राजसत्तेच्या प्रतिष्ठेच्यादृष्टीने ही पदावनतीच होती. याच्या अगोदर मराठ्याच्यामध्ये यादवी झाली. दोन सत्ता निर्माण झाल्या. पण याच्याबद्दलचे विवेचन सेतुमाधवराव पगडींनी केले नाही. त्याचबरोबर मराठी सत्तेचा ऱ्हास झाला. या मराठ्यांच्या विनाशाची कारणे याबद्दलही पगडींनी विवेचन केलेले आढळत नाही. त्याचबरोबर इंग्रज-मराठा पहिले युध्द, दुसरे युध्द व तिसरे युध्द याविषयी पगडींचे विवेचन आढळत नाही. बलुतेदारी या महत्वाच्या विषयाला पगडींनी स्पर्शही केलेला नाही.

# संदर्भ व तळटीपा

१) पगडी सेतुमाधवराव, इतिहास आणि कल्पित, पृ.३
२) पगडी सेतुमाधवराव, शिवचरित्र - एक अभ्यास, पृ.११
३) पगडी सेतुमाधवराव, महाराष्ट्र आणि मराठे, पृ.४६
४) पगडी सेतुमाधवराव, किर्लोस्कर, दिवाळी अंक, नोव्हेंबर१९७५, पृ.६४
५) पगडी सेतुमाधवराव, प्रतोद, दिवाळी अंक,१९७८, पृ.१२
६) पगडी सेतुमाधवराव, तन्वी-श्यामा, पृ.१६८
७) इतिहास आणि कल्पित, पृ.१८७
८) पगडी सेतुमाधवराव, श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ, पृ.१५६
९) शिवचरित्र - एक अभ्यास, पृ.६.७
१०) पगडी सेतुमाधवराव, मराठे व औरंगजेब, पृ.१७
११) पगडी सेतुमाधवराव, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द, पृ.४
१२) मराठे व औरंगजेब, पृ.१७
१३) पगडी सेतुमाधवराव, इतिहासाचा मागोवा, पृ.९०
१४) कित्ता, पृ.८६
१५) कित्ता, पृ.८८
१६) कित्ता, पृ.८८
१७) कित्ता, पृ.८७
१८) कुरूंदकर नरहर, ज्वाला (दिवाळी अंक),१९८०, पृ.१४६
१९) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.२५३
२०) कित्ता, पृ.२४३

२१) दिक्षित मो.ग. अहवाल व निवेदन, छत्रपती शिवाजी महाराज जन्मतिथी निर्णय समिती, ३ नोव्हेंबर,१९६६, पृ.५३

२२) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.११८

२३) पगडी सेतुमाधवराव, बळवंत(दिवाळी अंक) रत्नागिरी १९६०, पृ.३९

२४) पगडी सेतुमाधवराव, छत्रपती शिवाजी(इंग्रजी ग्रंथ), पृ.१४

२५) दैनिक केसरी, पुणे, १९ एप्रिल,१९८८, पृ.३

२६) इतिहासाचा मागोवा, पृ.७७

२७) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.१७

२८) कित्ता, पृ.१९८-१९९

२९) कित्ता, पृ.२०७

३०) कित्ता, पृ.२८-२९

३१) कित्ता, पृ.२४८

३२) कित्ता, पृ.२१४

३३) श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ, पृ.११-१२

३४) छत्रपती शिवाजी (इंग्रजी ग्रंथ), पृ.१३१

३५) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.६८

३६) श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ, पृ.३४

३७) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.६८

३८) श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ, पृ.९०-९१

३९) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.२२६

४०) कित्ता, पृ.२२६

४१) कित्ता, पृ.२२७

४२) पगडी सेतुमाधवराव, बहु असोत सुंदर, पृ.८०

४३) शिवचरित्र-एक अभ्यास, पृ.९७

४४) बहु असोत सुंदर, पृ.९१

४५) इतिहासाचा मागोवा, पृ.९

४६) मराठे व औरंगजेब, पृ.१६-१७

४७) तन्वी-श्यामा, पृ.१८-१९

४८) पगडी सेतुमाधवराव, कावेरी खोऱ्यातील यक्षनगरी, पृ.७

४९) कित्ता, पृ.१०८

५०) इतिहासाचा मागोवा, पृ.७९

५१) कित्ता, पृ.८३

५२) पगडी सेतुमाधवराव, जीवनसेतु, पृ.५७६

५३) इतिहासाचा मागोवा, पृ.११०